— DEVELOPED NATIONS —

# डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

▪ PRGI No. : MHMUL/25/A0594

Journalism for justice

♦ वर्ष १ ♦ अंक : २ ♦ साप्ताहिक ♦ पुणे, शनिवार, दिनांक २२ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट २०२६ ♦ पाने : १६ ♦ स्वागतमूल्य : १० रु.

अंक व जाहिरातींसाठी : ९१२२४१२४५१

# मोशी कचरा डेपो दुर्घटना

## पालिकेच्या निलंबित अधिकाऱ्यांवर सह-आरोपी म्हणून गुन्हा दाखल करण्याची मागणी



**पिंपरी-चिंचवड (प्रतिनिधी) :**

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पात घडलेल्या भीषण दुर्घटनेप्रकरणी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या निलंबित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून त्यांना सह-आरोपी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी यासंदर्भात विशेष तपास पथक एमआयडीसी भोसरी पोलीस ठाणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांना लेखी निवेदन सादर केले आहे.

मोशी कचरा डेपो परिसरात ८ जुलै रोजी पावसाच्या पाण्यामुळे कचऱ्याचा भलामोठा ढिगारा प्रशासकीय इमारतीवर कोसळला होता. या दुर्घटनेत ९ कामगारांचा निष्पाप मृत्यू झाला असून, ६ जण गंभीर जखमी झाले. एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा नोंदवून कंत्राटदार कंपनीच्या दोन पदाधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे. मात्र, एवढी मोठी दुर्घटना केवळ दोन कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे घडणे शक्य नसून, हा महापालिकेच्या प्रशासकीय आणि पर्यावरणीय पर्यवेक्षणातील गंभीर निष्काळजीपणा असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

महानगरपालिकेने १५ जुलै रोजी काढलेल्या आदेशानुसार मुख्य अभियंता (गट-अ) संजय नारायण कुलकर्णी आणि कार्यकारी अभियंता (पर्यावरण) योगेश सोपान आल्हाट यांच्यावर कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवून त्यांना तातडीने सेवानिलंबित केले आहे. कचरा डेपोचे दैनंदिन पर्यवेक्षण, कचऱ्याच्या ढिगाऱ्यांची स्थिती तपासणे, लिचेट ड्रेनेज व्यवस्था आणि सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात या अधिकाऱ्यांकडून गंभीर त्रुटी राहिल्याचे पालिकेच्या अहवालात स्पष्ट नमूद आहे. तसेच, अग्निशामक दलाचे केंद्र उपअधिकारी शशिकांत हिरामन चिपोळे यांच्या भूमिकेबाबतही चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

त्यामुळे केवळ कंपनीच्या कर्मचाऱ्यांपर्यंत तपास मर्यादित न ठेवता, निलंबित मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट आणि अग्निशमन अधिकारी शशिकांत चिपोळे यांच्यावर भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०५, १२५(अ), १२५(ब) आणि ३(५) अन्वये सदोष मनुष्यवधाचा सह-आरोपी म्हणून गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी वाघेरे यांनी केली आहे. याशिवाय, प्रकल्पाचे मंजूर आराखडे, स्ट्रक्चरल ऑडिट अहवाल, सीसीटीव्ही फुटेज, ई-मेल आणि डिजिटल पुरावे तत्काळ जप्त करून निष्पक्ष तपास करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### मोशी कचरा डेपोतील दुर्घटना आणि सध्याची स्थिती

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या मोशी येथील कचरा डेपोमध्ये ८ जुलै २०२६ रोजी अतिवृष्टीमुळे कचऱ्याचा अवाढव्य डोंगर अचानक खचून 'वेस्ट-टू-एनर्जी' (कचऱ्यापासून ऊर्जा निर्मिती) प्रकल्पाच्या तीन मजली प्रशासकीय इमारतीवर कोसळला होता.

**जीवितहानी व बचावकार्य:** या भीषण दुर्घटनेत इमारतीत काम करणारे २३ कामगार ढिगाऱ्याखाली अडकले होते. एनडीआरएफ, भारतीय सेना, महापालिका आणि पीएमआरडीएच्या अग्निशामक दलाने राबवलेल्या सलग चार दिवसांच्या बचावकार्यात ९ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर १२ जण जखमी झाले.

**चौकशी आणि प्रशासकीय अहवाल:** राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने पुण्याच्या विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली. या समितीने १४ ऑगस्ट २०२६ रोजी आपला प्राथमिक अहवाल सरकारला सादर केला आहे. इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट, धोकादायक क्षेत्रात इमारतीचे केलेले बांधकाम आणि महापालिका व कंत्राटदार कंपनीतील जबाबदाऱ्यांची निश्चिती यावर अहवालात तांत्रिक छाननी करण्यात आली आहे.

**न्यायालयीन हस्तक्षेप:** या दुर्घटनेची राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने दखल घेत स्वतंत्र चौकशीचे आदेश दिले असून, स्थानिक पातळीवर जबाबदार अधिकारी व कंत्राटदारांवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

YUVRAJ DHAMALE CORP

'युवराज ढमाले कोर्प' कडून वृत्तपत्राला पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

— DEVELOPED NATIONS —
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

# पलूस - सांगलीत वकिलाला आला प्रत्यक्ष अनुभव ई-फायलिंग तातडीच्या न्यायासाठी अडथळा ठरते तेव्हा...

**पुणे, प्रतिनिधी :**

पलूस, सांगली येथे एका तातडीच्या कायदेशीर प्रकरणासाठी जवळपास चार तास प्रवास एका वकील साहेबांनी नुकताच केला. सुरुवातीला त्यांना हे एक नियमित फायलिंगप्रमाणे वाटले, पण प्रत्यक्षात हा अनुभव वकील आणि पक्षकारांना ई-फायलिंग व डिजिटल न्यायालयांच्या संक्रमणात येणाऱ्या अडचणींचा गंभीर विचार करायला भाग पाडणारा ठरला.

या वकील साहेबांच्या प्रकरणाला तातडीची न्यायालयीन हस्तक्षेपाची गरज होती. त्यांच्या क्लायंटच्या प्रकरणातील परिस्थिती समजून घेतल्यानंतर लक्षात आले की, तातडीचा प्रश्न फक्त विरोधी पक्षाशी असलेल्या वादाचा नव्हता, तर पोलिसांकडून होत असलेल्या अनियमिततेचा होता. विरोधी पक्ष प्रभावशाली व्यक्ती व बिल्डर होता, ज्यामुळे वेळेवर न्यायालयीन हस्तक्षेप अधिक महत्त्वाचा ठरला.

गांभीर्य लक्षात घेऊन या प्रकरणासाठी त्यांना अर्धी रात्र काम करावे लागले. वकिलांनी कागदपत्रे व्यवस्थित करून अर्ज काळजीपूर्वक तयार केला. हे वकील पलूस, सांगली येथे गेले, जेणेकरून प्रकरण न्यायालयासमोर विलंब न होता मांडता येईल.

दुपारी १२ वाजता मसुदा तयार झाला. वकील फायलिंगसाठी सज्ज होते आणि दुपारनंतरच्या सत्रात प्रकरण तातडीच्या यादीत येईल, अशी अपेक्षा त्यांना होती.

पण याच टप्प्यावर वेगळाच अडथळा वकिलांना आला. हा तथ्यांचा, कायद्याचा, कागदपत्रांचा अभाव नव्हता.

तर अडथळा होता तो ई-फायलिंग प्रणालीचा. ई-फायलिंग पोर्टल तांत्रिक बिघाडामुळे उघडतच नव्हते. व्यावसायिक



सेवा पुरवठादारांच्या मदतीने प्रयत्न केले, पण निष्फळ ठरले. सकाळची दुपार झाली, संध्याकाळ झाली. पण डिजिटल प्रणालीमुळे फायलिंग रोखून धरले गेले होते. संध्याकाळी पावणेसहा वाजता पोर्टल उघडले. तरीही फायलिंगसाठी आणखी एक तास लागला. अशा रीतीने पूर्ण दिवस वाया गेला. न्यायालयीन संरक्षण मिळवण्याच्या प्रक्रियेतच तंत्रज्ञान अडथळा ठरले, अशी भावना या वकिलांनी व्यक्त केली.

तातडीच्या प्रकरणात पोर्टल तासन्‌तास बंद राहणे, ही फक्त तांत्रिक अडचण नसून, न्यायालयीन संरक्षण मिळवण्याच्या हक्कावर परिणाम करणारी बाब आहे. म्हणून प्रश्न असा निर्माण होतो की, न्यायप्रवेश सुलभ करण्यासाठी तयार केलेली डिजिटल प्रणालीच न्यायप्रवेशात विलंबाचे कारण ठरत आहे का? अनेक कनिष्ठ न्यायालयांत अजूनही पूर्णपणे पेपरलेस कामकाजासाठी आवश्यक परिसंस्था विकसित झालेली नाही. वकिलांकडे डिजिटल फाईल असली तरी प्रत्यक्षात अनेकदा कागदी प्रती मागितल्या जातात. यामुळे वकिलांना दुहेरी व्यवस्था ठेवावी लागते.

अनेक ठिकाणी इंटरनेट अस्थिर, वाय-फाय अपुरा, संगणक टर्मिनल कमी, मोबाईल नेटवर्क कमजोर असते. न्यायालयीन कामकाजात वेळ महत्त्वाचा असतो. काही तासांचा विलंबही तातडीच्या संरक्षणासाठी घातक ठरू शकतो.

डिजिटायझेशन म्हणजे फक्त ऑनलाइन अपलोड करणे नव्हे, तर संपूर्ण सिस्टीम उपडेट असणे आवश्यक असते. विश्वासार्ह व नियमितपणे तपासले जाणारे ई-फायलिंग पोर्टल, वकील व न्यायालयीन कर्मचाऱ्यांसाठी तांत्रिक सहाय्य, पोर्टल बिघाडाची रिअल-टाइम माहिती देणारी प्रणाली, तातडीच्या प्रकरणांसाठी पर्यायी फायलिंग यंत्रणा, कनिष्ठ न्यायालयांत पुरेशी इंटरनेट सुविधा या गोष्टी आवश्यक आहेत.

---

## विधी अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेशप्रक्रियेत मोठी वाढ; साडेसात हजारांहून अधिक नव्या जागा उपलब्ध



**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील तीन आणि पाच वर्षांच्या विधि (लॉ) अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेशप्रक्रियेत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे तिसऱ्या फेरीचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. या सुधारित प्रक्रियेनुसार प्रवेशप्रक्रियेत १३० नवीन महाविद्यालयांची भर पडली असून, त्यामुळे तब्बल ७ हजार ६२० नवीन जागा प्रवेशासाठी उपलब्ध झाल्या आहेत. या वाढीमुळे दोन्ही अभ्यासक्रम मिळून साडेसात हजारांहून अधिक जागांची लक्षणीय वाढ झाली आहे.

सीईटी कक्षाने दिलेल्या माहितीनुसार, तीन वर्षांच्या विधी अभ्यासक्रमासाठी सुधारित जागा वाटप जाहीर करण्यात आले आहे.

**प्राधान्यक्रम नोंदवण्याला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

दोन्ही अभ्यासक्रमांसाठी पसंतीक्रम भरण्याच्या शेवटच्या दिवसाअखेर एकूण ३३ हजार २०३ विद्यार्थ्यांनी आपले प्राधान्यक्रम नोंदवले आहेत. यामध्ये तीन वर्षांच्या विधि अभ्यासक्रमासाठी २३ हजार ३९१ विद्यार्थ्यांनी, तर पाच वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी ९ हजार ८१२ विद्यार्थ्यांनी आपले अर्ज सादर केले आहेत.

**महाविद्यालये आणि उपलब्ध जागांचा तपशील**

३ वर्षे विधी अभ्यासक्रमासाठी सुरुवातीला या अभ्यासक्रमासाठी ९३ महाविद्यालये आणि १० हजार १०५ जागा उपलब्ध होत्या. यात आता ७० नवीन महाविद्यालयांची वाढ झाली असून, एकूण महाविद्यालयांची संख्या १६३ झाली आहे. यामुळे ४ हजार ७१० नव्या जागांची भर पडून एकूण उपलब्ध जागा १४ हजार ८१५ झाल्या आहेत.

५ वर्षे विधि अभ्यासक्रमासाठी सुरुवातीला ५६ महाविद्यालयांमध्ये ५ हजार ९५५ जागा होत्या. त्यात ६० नव्या महाविद्यालयांची भर पडल्याने एकूण महाविद्यालये ११६ झाली आहेत. या फेरीत २ हजार ९१० नवीन जागा उपलब्ध झाल्याने या अभ्यासक्रमासाठीची एकूण जागांची संख्या ८ हजार ८६५ वर पोहोचली आहे.

राज्यात प्रवेशप्रक्रियेत नव्याने १३० महाविद्यालये सहभागी झाल्याने एकूण विधि महाविद्यालयांची संख्या २७९ झाली आहे. या वाढीमुळे एकूण ७ हजार ६२० नवीन जागांसह आता राज्यभरात विधि शिक्षणासाठी २३ हजार ६८० जागा विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाल्या आहेत.

---

## कमी हजेरीमुळे परीक्षेपासून वंचित विद्यार्थ्यांना दिलासा; सत्र परीक्षेला बसण्याची मुंबई उच्च न्यायालयाची परवानगी

**पुणे : प्रतिनिधी**

वर्गहजेरी कमी असल्याच्या कारणावरून सत्र परीक्षेपासून वंचित राहावे लागलेल्या पुण्यातील इंडियन लॉ सोसायटीच्या (आयएलएस) विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायालयाने या विद्यार्थ्यांना सत्रअखेरच्या परीक्षांना बसण्याची परवानगी दिली असून, ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा चुकली आहे, त्यांच्यासाठी पुढील चार आठवड्यांत पुरवणी परीक्षा आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायमूर्ती आर. आय. छागला आणि न्यायमूर्ती फरहान पी. दुबाश यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाच्या आदेशानुसार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि आयएलएस विधी महाविद्यालयाने अशा विद्यार्थ्यांसाठी आगामी चार आठवड्यांत पुरवणी परीक्षेचे आयोजन करावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात पुढील प्रवेश घेता येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने २१ जुलै रोजी दिलेल्या एका आदेशाचा हवाला देत, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये हजेरीची तूट असलेल्या सर्व विधी विद्यार्थ्यांना 'एकवेळची सवलत' (वन टाईम मेझर) लागू होईल, असे उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले.

**काय आहे प्रकरण?**

आयएलएस विधी महाविद्यालयातील तीन आणि पाच वर्षांच्या अभ्यासक्रमातील सुमारे ४१ विद्यार्थ्यांनी हजेरीच्या मुद्द्यावरून मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली होती. बार कौन्सिल ऑफ इंडियाच्या (बीसीआय) नियमांनुसार ७० टक्के, तर विद्यापीठाच्या अध्यादेशानुसार ७५ टक्के हजेरी अनिवार्य आहे. हजेरीचे हे प्रमाण पूर्ण नसल्याने महाविद्यालयाने या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) रोखले होते.

याचिकाकर्त्या विद्यार्थ्यांनी दिल्ली उच्च न्यायालयाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी 'सुशांत रोहिल्ला' प्रकरणात दिलेल्या महत्त्वाच्या निकालाचा संदर्भ न्यायालयासमोर ठेवला होता. बीसीआयच्या नियमांचा फेरविचार होईपर्यंत केवळ हजेरीच्या तुटवड्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याला परीक्षेपासून किंवा शैक्षणिक प्रगतीपासून रोखता येणार नाही, असा निर्णय दिल्ली उच्च न्यायालयाने दिला होता.

या आधारावर मुंबई उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना अंतरिम दिलासा देत परीक्षेला बसण्याची परवानगी दिली होती. दरम्यान, दिल्ली उच्च न्यायालयाच्या या निर्णयाला बीसीआयने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे.

# आंतरराष्ट्रीय वादात माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची मध्यस्थ म्हणून नियुक्ती

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) –**
युक्रेनमधील सरकारी मालकीच्या ओशाद बँकेसोबतच्या गुंतवणूक करारावरून निर्माण झालेल्या आंतरराष्ट्रीय वादात रशियाकडून भारताचे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांची मध्यस्थ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

'ग्लोबल आर्बिट्रेशन रिव्ह्यू'ने दिलेल्या वृत्तानुसार, या वादावर तोडगा काढण्यासाठी तीन सदस्यांचे लवाद न्यायाधिकरण गठित करण्यात आले आहे. कोस्टारिकाच्या मध्यस्थ व माजी व्यापारमंत्री दिहाला जिमेनेझ या तीन सदस्यीय लवाद न्यायाधिकरणाच्या अध्यक्ष असतील. दोन्ही पक्षांनी संयुक्तपणे जिमेनेझ यांची



या अध्यक्षपदासाठी निवड केली आहे. युक्रेन आणि रशिया यांच्यात १९९८ मध्ये झालेल्या द्विपक्षीय गुंतवणूक कराराअंतर्गत ही आंतरराष्ट्रीय मध्यस्थी प्रक्रिया अधिकृतपणे सुरू करण्यात आली आहे.

# कायदा विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्याबद्दल बार कौन्सिल अध्यक्षांकडून खेद व्यक्त

**नवी दिल्ली –**
नुकत्याच घडलेल्या घडामोडींमुळे कायदा (लॉ) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता लक्षात घेऊन बार कौन्सिल ऑफ इंडियाचे (बीसीआय) अध्यक्ष, जेष्ठ वकील मनन कुमार मिश्रा यांनी विद्यार्थ्यांची माफी मागत खेद व्यक्त केला आहे. स्वातंत्रदिनाचे औचित्य साधून देशभरातील कायदा विद्यार्थ्यांना लिहिलेल्या पत्रात मिश्रा यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांच्या भावना किंवा हितसंबंध दुखावले गेले असतील, तर त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करण्यात कोणताही संकोच अथवा अहंपणा असण्याचे कारण नाही.

पत्रात त्यांनी नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी सह इतर विधी महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे कौतुक करत, ते उद्याचे वकील, न्यायाधीश व कायदेतज्ज्ञ असल्याचे नमूद केले. स्वतंत्र विचार करण्याची आणि स्वतःच्या विवेकबुद्धीने निर्णय घेण्याची पूर्ण क्षमता या विद्यार्थ्यांमध्ये आहे. त्यामुळे त्यांच्यावर कोणताही बाह्य

**स्वायत्त निर्णयाचा अधिकार मान्य करत संवादाचे आवाहन**

दबाव किंवा प्रभाव असू नये, अशी भूमिका बार कौन्सिलने मांडली आहे.

**निषेध नोंदवणे लोकशाहीचा भाग, पण चर्चेचा मार्ग खुला हवा**

शांततापूर्ण मार्गाने असंतोष व्यक्त करणे, प्रश्न विचारणे आणि विरोध नोंदवणे ही संविधानात्मक लोकशाहीची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत, असे सांगत अध्यक्षांनी स्पष्ट केले की विद्यार्थ्यांना आपले मत मांडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे. मात्र, नवीन तथ्ये व स्पष्टीकरणे समोर आल्यावर पूर्वग्रहदूषित न होता, खुल्या मनाने विषयाचा पुनर्विचार करणे ही देखील विधी क्षेत्राची जुनी परंपरा आहे.

**पदवीप्रदान समारंभाबाबत विद्यार्थ्यांचा स्वतःचा निर्णय**

पदवीप्रदान (दीक्षांत) समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील आणि त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत महत्त्वाचा क्षण असतो. अशा समारंभास उपस्थित राहायचे की नाही, याचा अंतिम निर्णय पूर्णपणे विद्यार्थ्यांचाच असायला हवा. कोणत्याही विद्यार्थ्यावर उपस्थित राहण्यासाठी किंवा अनुपस्थित राहण्यासाठी दबाव आणला जाऊ नये. विद्यार्थ्यांनी सर्व बाबींचा स्वतंत्रपणे विचार करून स्वतःच्या इच्छेने योग्य तो निर्णय घ्यावा, असे आवाहनही या पत्रातून करण्यात आले आहे.

**विषयाचे राजकीयीकरण न करण्याचे आवाहन**

न्यायव्यवस्था, बार कौन्सिल, शिक्षण संस्था आणि विधी विद्यार्थी यांच्यातील नाते हे अत्यंत खोल व कायमस्वरूपी आहे. तात्पुरत्या मतभेदांमुळे या संबंधांवर परिणाम होऊ नये. या मुद्द्याला कोणतेही राजकीय किंवा बाह्य रूप दिले जाऊ नये. संवादाच्या माध्यमातून आणि संविधानात्मक मूल्यांचा आदर राखून वादावर तोडगा काढला जावा, अशी अपेक्षा व्यक्त करत मनन कुमार मिश्रा यांनी सर्व विद्यार्थ्यांना स्वतंत्र विचार आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# स्वयंसेवी संस्थांचे 'एफसीआरए' नूतनीकरण रोखण्याचा केंद्र सरकारचा निर्णय केरळ उच्च न्यायालयाकडून रद्द

**कोची (वृत्तसंस्था) –**
विझिंगम बंदर प्रकल्पाविरोधातील आंदोलनांना निधी पुरवल्याचा आरोप असलेल्या दोन स्वयंसेवी संस्थांचे (एनजीओ) 'एफसीआरए' (परदेशी योगदान नियंत्रण कायदा) प्रमाणपत्र नूतनीकरण न करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय केरळ उच्च न्यायालयाने रद्द केला आहे.

केवळ स्थानिक आंदोलनाला आर्थिक मदत करणे म्हणजे परदेशी निधीचा अनिष्ट उद्दिष्टांसाठी वापर किंवा सार्वजनिक हिताविरुद्धचे कृत्य मानता येणार नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने केंद्र सरकारचा हा आदेश अयोग्य ठरवला आहे. केरळ उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे संबंधित संस्थांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमीन वाटपाचे नवीन धोरण जाहीर; पारदर्शक लिलाव पद्धती लागू

**मुंबई –**
राज्यात सहकारी गृहनिर्माण संस्थांना शासकीय जमिनींचे वाटप करण्यासाठी राज्य शासनाने अत्यंत पारदर्शक आणि सुधारित धोरण निश्चित केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेऊन हे नवीन धोरण तयार केले आहे. यामुळे २०१० पासून जमीन वाटपावर असलेली स्थगिती उठणार असून, राज्यातील शासकीय कर्मचारी, पत्रकार, कलाकार आणि मागासवर्गीयांना हक्काच्या घरासाठी शासकीय भूखंड मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

नवीन धोरणानुसार, यापुढे शासकीय भूखंडांचे वाटप जुन्या सोडत पद्धतीऐवजी 'थेट लिलाव' प्रक्रियेद्वारे ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने केले जाईल. सर्व जिल्हाधिकारी आपापल्या जिल्ह्यातील भूखंडांची यादी तयार करून सार्वजनिक लिलाव घेतील. मुंबई शहर व उपनगरासाठी जमिनीच्या बाजारमूल्याच्या २.५ टक्के आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी ५ टक्के पायाभूत किंमत गृहीत धरून सर्वाधिक बोली लावणाऱ्या संस्थेला जमीन दिली जाईल. ३० वर्षांनंतर या जमिनी भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यास पात्र ठरतील.

विविध घटकांसाठी भूखंड आरक्षण–





समाजातील सर्व घटकांना संधी मिळावी यासाठी भूखंडांमध्ये आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. सर्वसाधारण प्रवर्गासाठी ४० टक्के, शासकीय कर्मचाऱ्यांसाठी १५ टक्के, अनुसूचित जाती-जमाती व भटक्या जमातींसाठी १० टक्के, तर साहित्यिक, कलाकार, क्रीडापटू व पत्रकारांसाठी १० टक्के आरक्षण असेल. याशिवाय केंद्र सरकारी कर्मचारी व आजी-माजी सैनिक, लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्यसैनिक, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी प्रत्येकी ५ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे.

**वेतन आयोगानुसार उत्पन्न मर्यादा आणि चटईक्षेत्र –**

७ व्या वेतन आयोगानुसार उत्पन्न मर्यादा व चटईक्षेत्राची (कार्पेट एरिया) श्रेणीनुसार पुनर्रचना करण्यात आली आहे.

गट-ड – ५० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांसाठी ३०० चौ. फूट.

गट-क – ५० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत उत्पन्नासाठी ४५० चौ. फूट.

गट-ब – १ लाख ते १ लाख ५० हजार रुपयांपर्यंत उत्पन्नासाठी ६५० चौ. फूट.

गट-अ – कर्मचाऱ्यांसाठी १०७६ चौ. फूट चटईक्षेत्र निश्चित केले असून, त्यांना उत्पन्नाची अट लागू असणार नाही.

बेनामी सदस्यांवर कठोर कारवाई –

या धोरणात पती-पत्नींना संयुक्त सभासदत्व' अनिवार्य करण्यात आले आहे. गृहनिर्माण संस्थेत 'डमी' किंवा बेनामी सदस्य आढळल्यास तो फ्लॅट विना-मोबदला थेट शासनजमा करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच, या नवीन धोरणाच्या अंमलबजावणीनंतर प्रलंबित असलेले जुने सर्व प्रस्ताव दसरी दाखल केले जाणार असून, केवळ 'हेतूपत्र' दिलेल्या प्रकरणांना नवीन दराने जमीन मंजूर केली जाईल.

# विद्यार्थ्यांना शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार; सर्वोच्च न्यायालयाकडून 'बार कौन्सिल'ची कानउघाडणी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) –**
हैदराबाद येथील प्रतिष्ठित 'नालसार' विधी विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सनद नोंदणीला 'बार कौन्सिल ऑफ इंडिया'ने दिलेली स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवली आहे. बार कौन्सिलची ही कारवाई पूर्णपणे

अनावश्यक आणि अयोग्य असल्याचे स्पष्ट करत, विद्यार्थ्यांना शांततापूर्ण मार्गाने निदर्शने करण्याचा घटनात्मक अधिकार असल्याचे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाने केले आहे.

विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी आमंत्रित पाहुण्यांच्या उपस्थितीवरून काही विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते. या पार्श्वभूमीवर 'बार कौन्सिल ऑफ इंडिया'ने संबंधित तुकडीच्या विद्यार्थ्यांची सनद नोंदणी रोखण्याचे निर्देश राज्य बार कौन्सिलला दिले होते. या निर्णयावर सर्वस्तरातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्यानंतर कौन्सिलने तो निर्णय मागे घेतला होता.

या प्रकरणावर सुनावणीदरम्यान न्यायालयाने बार कौन्सिलच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. हा सर्वोच्च न्यायालय आणि विद्यार्थ्यांमधील थेट संवादाचा भाग असून, बार कौन्सिलने यात अनावश्यक हस्तक्षेप करू नये, अशा शब्दांत न्यायालयाने कौन्सिलची कानउघाडणी केली. तसेच, या आंदोलनात सहभागी झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्यावर दंडात्मक किंवा नियमभंगाची कारवाई केली जाऊ नये, असे स्पष्ट निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

## विशेष संपादकीय

# कायद्याचे राज्य आणि नागरिकांचे अधिकार



एम. जे. श्रीकांत
व्यवस्थापकीय संपादक
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

भारतीय संविधानाने या देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. मात्र, बदलत्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात संविधानाने दिलेले हे मूलभूत अधिकार सुरक्षित ठेवणे, ही एक मोठी आव्हानात्मक बाब बनली आहे. अलिकडच्या काही घडामोडींकडे नजर टाकल्यास असे दिसून येते की, नागरिकांचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य, शांततापूर्ण मार्गाने विरोध दर्शवण्याचा अधिकार आणि संस्थांची स्वायत्तता यांवर विविध पातळ्यांवरून गदा आणण्याचा प्रयत्न होत आहे. अशा वेळी 'कायद्याचे राज्य' केवळ पुस्तकी न राहता प्रत्यक्ष व्यवहारात टिकवून ठेवणे, ही आपल्या लोकशाहीची प्राथमिक गरज बनली आहे.

अनेकदा अधिकारांचा किंवा पदाचा वापर करून सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी किंवा घटकांचे आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु, आपल्या देशातील न्यायव्यवस्थेने वेळोवेळी हे सिद्ध केले आहे की, लोकशाहीत असंतोष व्यक्त करणे, प्रश्न विचारणे किंवा शांततापूर्ण मार्गाने आपले मत मांडणे हा गुन्हा ठरू शकत नाही. कायदेविषयक शिक्षण घेणारे विद्यार्थी असोत, नवोदित व्यावसायिक असोत की सामान्य नागरिक; त्यांच्या विचार स्वातंत्र्यावर आणि कायदेशीर हक्कांवर कोणत्याही बाह्य घटकाचा अयोग्य प्रभाव किंवा दबाव असणे लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहे. संवादाचे दरवाजे उघडे ठेवून, परस्पर आदर राखून आणि संविधानात्मक मूल्यांच्या चौकटीत राहूनच कोणत्याही वादावर योग्य तोडगा काढला जाऊ शकतो, हा वस्तुपाठ आपल्याला आपला इतिहास सातत्याने शिकवत आला आहे.

विधी क्षेत्राची आणि कायदेशीर साक्षरतेची जबाबदारी केवळ न्यायालयांपुरती किंवा वकिलांच्या अभ्यासापुरती मर्यादित नसते. कायद्याची खरी ताकद ही त्याच्या जागरूकतेमध्ये असते. जेव्हा समाजातील प्रत्येक घटकाला आपल्या हक्कांची, कर्तव्यांची आणि कायदेशीर संरक्षणाची अचूक माहिती असते, तेव्हाच सत्ता किंवा प्रशासनाकडून होणाऱ्या संभाव्य मनमानीला पायबंद बसतो. 'कायद्याची भीती' वाटण्याऐवजी 'कायद्याचे संरक्षण' प्रत्येक नागरिकाला अनुभवायला मिळायला हवे.

याच उद्देशाने, कायदेविषयक घडामोडींचे निष्पक्ष विश्लेषण, न्यायालयांचे महत्त्वपूर्ण निकाल आणि नागरिकांच्या हक्कांची मांडणी करण्यासाठी आपण या साप्ताहिकाची सुरुवात करत आहोत. कोणत्याही राजकीय किंवा व्यक्तिगत प्रभावापासून दूर राहून, केवळ सत्य आणि कायद्याची योग्य बाजू समोर आणणे हेच आपले मुख्य ध्येय असेल. न्यायव्यवस्थेची स्वायत्तता आणि नागरिकांचे स्वातंत्र्य अबाधित राहण्यासाठीचा हा वैचारिक लढा आणि कायदेशीर साक्षरतेचा प्रवास यापुढे असाच अविरत सुरू राहील.



# न्यायालयीन स्वायत्तता, वकिलांचे हक्क आणि बार कौन्सिलची जबाबदारी



ॲड. विशाल विजयराव काळे
मुख्य मार्गदर्शक
डेवलप्ड नेशन्स लॉ न्यूज

गेल्या काही दिवसांत देशातील कायदेविषयक घडामोडी आणि विविध न्यायालयांचे आलेले निकाल पाहता, भारतातील विधी क्षेत्र एका नव्या वळणावर उभे असल्याचे स्पष्ट दिसते. विधी संस्थांचे स्वातंत्र्य, नवोदित वकिलांचे अधिकार आणि बार कौन्सिलसारख्या नियामक संस्थांचे कार्यक्षेत्र यांवर सार्वजनिक पातळीवर व्यापक मंथन सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर, उच्च न्यायालयीन निकाल आणि सर्वोच्च न्यायालयाचे ताजे दृष्टीकोन यांचा सखोल आढावा घेणे कायद्याच्या राज्यासाठी अत्यंत गरजेचे ठरते.

**बँकिंग क्षेत्र आणि वकिलांचे व्यावसायिक स्वातंत्र्य**

सर्वोच्च न्यायालयाने 'अजय विज विरूद्ध इंडियन बँक्स असोसिएशन' प्रकरणात दिलेला निकाल वकिलांच्या व्यावसायिक स्वातंत्र्यासाठी अत्यंत मैलाचा दगड ठरला आहे. एखाद्या बँकेने किंवा वित्तीय संस्थेने वकिलाला आपल्या पॅनेलवरून हटवणे ही त्यांची अंतर्गत बाब असू शकते; परंतु केवळ कायदेशीर सल्ल्यातील तफावत किंवा हलगर्जीपणाच्या आरोपावरून संबंधित वकिलाला संपूर्ण बँकिंग क्षेत्रात 'ब्लॅकलिस्ट' करणे किंवा 'कॉशन-लिस्ट' जारी करणे हे कायदेशीर चौकटीला धरून नाही.

ॲडव्होकेट्स ॲक्टनुसार वकिलांच्या शिस्तभंगाची किंवा गैरवर्तनाची चौकशी करण्याचे एकमेव अधिकार हे बार कौन्सिलकडे आहेत. बँकेने स्वतःच न्यायाधीशाची भूमिका घेऊन वकिलाचे व्यावसायिक भवितव्य धोक्यात आणणे, हे त्याच्या उपजीविकेच्या आणि व्यावसायिक स्वातंत्र्याच्या मूलभूत हक्कावर गदा आणणारे आहे. या निर्णयामुळे वित्तीय संस्थांच्या मनमानीला आळा बसला असून वकिलांना मोठे कायदेशीर संरक्षण मिळाले आहे.

**नवोदित वकील आणि 'एआयबीई'ची वस्तुस्थिती**

दुसरीकडे, 'ऑल इंडिया बार एक्झामिनेशन' वरून नव्याने सनद मिळालेल्या वकिलांमध्ये सातत्याने गैरसमज पसरवले जात होते. परंतु बार कौन्सिल ऑफ इंडियाने परिपत्रकाद्वारे हे स्पष्ट केले आहे की, राज्य बार कौन्सिलमध्ये नोंदणी झाल्यानंतर पहिल्या दोन वर्षांच्या कालावधीत नवोदित वकिलांना न्यायालयात वकिली करण्याचा, वकालतनामा दाखल करण्याचा आणि अशिलांची बाजू मांडण्याचा पूर्ण अधिकार असतो.

परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिलेला दोन वर्षांचा कालावधी हा प्रॅक्टिस थांबवण्यासाठी नसून, ती पुढे सुरू ठेवण्याची अट आहे. या काळात बार असोसिएशनमधील मतदानाचे अधिकार तात्पुरते रोखले गेले, तरी प्रत्यक्ष वकिलीच्या मूलभूत अधिकारात कोणतीही कपात होत नाही. अनेक ठिकाणी स्थानिक पातळीवर किंवा बार असोसिएशनकडून नवख्या वकिलांवर होणाऱ्या अन्यायकारक बंदीला या स्पष्टीकरणामुळे पूर्णविराम मिळाला आहे.

**संस्थांची स्वायत्तता आणि संवादाची गरज**

विधी क्षेत्राचा दर्जा उंचावण्यासाठी 'सतत कायदेशीर शिक्षण' आणि प्रस्तावित 'राष्ट्रीय विधी अकादमी' या संकल्पना निश्चितच स्वागतार्ह आहेत. मात्र, या सुधारणा राबवताना लोकशाही मूल्यांचा आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करणे तितकेच आवश्यक आहे. कोणत्याही वादात किंवा असंतोषात संस्थात्मक दबावापेक्षा 'संवाद' आणि 'समान न्याय' या तत्त्वांचा वापर व्हायला हवा.

कायदा हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते समाजाला दिशा देणारे माध्यम आहे. जेव्हा न्यायालयांचे निकाल वकिलांचे हक्क अबाधित ठेवतात आणि नियामक संस्था आपल्या अधिकारांची योग्य सीमा ओळखतात, तेव्हाच देशातील न्यायव्यवस्थेवरील सामान्य नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होतो.

# विनापरवाना डिजिटल फलक उभारल्यास कठोर कायदेशीर कारवाई; महापालिका प्रशासनाचा इशारा

**पुणे –** शहरातील सार्वजनिक जागा, रस्ते, दुभाजक आणि शासकीय मालमत्तांवर विनापरवाना अनधिकृत डिजिटल फलक (बॅनर्स/हॉर्डिंग्ज) उभारणाऱ्यांवर आता महापालिका प्रशासनाकडून थेट गुन्हे दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. शहराच्या सौंदर्याला बाधा पोहोचवणारे आणि नागरिकांच्या सुरक्षेला धोका निर्माण करणारे अनधिकृत फलक तत्काळ काढून घेण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

काही दिवसांपासून शहरातील विविध मुख्य रस्ते आणि चौकांमध्ये विनापरवाना जाहिरात फलक, राजकीय व वैयक्तिक शुभेच्छांचे डिजिटल बॅनर्स मोठ्या प्रमाणावर लावण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असून, अनेकदा हे फलक वाऱ्यामुळे किंवा अपुऱ्या आधारामुळे कोसळून गंभीर अपघात होण्याचा धोका वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर, महापालिकेच्या परवाना व आकाशचिन्ह विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. कोणतीही पूर्वपरवानगी न घेता डिजिटल फलक लावल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि सार्वजनिक मालमत्ता विद्रूपीकरण प्रतिबंधक कायद्यान्वये संबंधित व्यक्ती, संस्था किंवा जाहिरातदारावर दंडात्मक कारवाईसह पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

**नागरिकांना आवाहन –**

आपल्या परिसरातील किंवा रस्त्यांवरील अनधिकृत फलकांची माहिती नागरिकांनी महापालिकेच्या तक्रार निवारण कक्षाकडे द्यावी. सुरक्षित आणि सुंदर शहरासाठी सर्व नागरिकांनी व संस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' जाहीर

**विशेष प्रतिनिधी/मुंबई**

राज्यभरातील महसूल न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या हजारो दाव्यांचा आणि अपीलांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी महसूल विभागाने 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सात महिन्यांच्या कालावधीत हे अभियान संपूर्ण राज्यात राबवले जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा निर्णय घेतला असून, महसूल विभागाने यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे अर्धन्यायिक न्यायालयांच्या फेऱ्या मारणाऱ्या लाखो पक्षकारांचा वेळ आणि पैसा वाचून मोठा दिलासा मिळणार आहे.

मंडळ अधिकाऱ्यांपासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्व न्यायालये समाविष्ट या अभियानांतर्गत महसूल प्रशासनातील सर्वात खालच्या स्तरापासून ते वरिष्ठ स्तरापर्यंतच्या सर्व अर्धन्यायिक न्यायालयांमधील प्रलंबित दाव्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये प्रामुख्याने मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अपर जिल्हाधिकारी आणि जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात चालणाऱ्या सर्व प्रकारच्या महसुली खटल्यांचा तडजोडीच्या माध्यमातून निपटारा केला जाईल.

**दर तीन महिन्यांनी 'महसूल लोक अदालत'**

शासकीय आदेशानुसार, या सात महिन्यांच्या कालावधीत दर तीन महिन्यांतून एकदा सर्व स्तरांवर 'महसूल लोक अदालत' आयोजित करणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे.

**तडजोडीची प्रक्रिया कशी असेल?**

प्रलंबित दाव्यातील दोन्ही पक्षकार किंवा त्यांचे वकील संयुक्तपणे 'प्रपत्र-अ' या विहित नमुन्यात तडजोडीसाठी अर्ज सादर करू शकतील. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर दोन्ही पक्षांच्या संमतीने कायदेशीर तडजोडनामा तयार केला जाईल. त्यानंतर निश्चित केलेल्या लोक अदालतीच्या दिवशी दोन्ही बाजूंची औपचारिक संमती घेऊन अंतिम आदेश पारित केला जाईल आणि प्रकरण कायमस्वरूपी निकाली काढले जाईल.

# सनद मिळताच नवख्या वकिलांना दोन वर्षे प्रॅक्टिसचा पूर्ण अधिकार

**नवी दिल्ली –** राज्य बार कौन्सिलमध्ये नोंदणी (एनरोलमेंट) होताच नव्या वकिलांना दोन वर्षांच्या कालावधीसाठी प्रत्यक्ष वकिली आणि कामकाज करण्याचा पूर्ण अधिकार असतो, असे स्पष्टीकरण बार कौन्सिल ऑफ इंडियाने (बीसीआय) दिले आहे. 'ऑल इंडिया बार एक्झामिनेशन' (एआयबीई) परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वी वकिलांना न्यायालयात वकालतनामा दाखल करण्यास किंवा प्रॅक्टिस करण्यास कोणतीही संस्था किंवा बार असोसिएशन रोखू शकत नाही, असे बीसीआयचे मुख्य सचिव श्रीमंतो सेन यांनी जारी केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

कर्नाटक स्टेट बार कौन्सिलने विचारलेल्या विविध प्रश्नांना उत्तर देताना बार कौन्सिल ऑफ इंडियाने ही कायदेशीर बाजू स्पष्ट केली आहे. नोंदणीनंतर मिळणारे 'प्रोव्हिजनल' (तात्पुरते) प्रमाणपत्र म्हणजे वकिलीच्या अधिकारावर कोणतीही बंधने नव्हेत. या दोन वर्षांच्या काळात नवोदित वकील न्यायालयात, न्यायाधिकरणात (ट्रिब्युनल) अशिलांची बाजू मांडू शकतात, कायदेशीर सल्ला देऊ शकतात तसेच नोटीस व दावे मसुदा तयार

**बार कौन्सिल ऑफ इंडियाचे स्पष्टीकरण**



करण्याचे सर्व अधिकार त्यांना असतात.

निवडणूक लढवता येणार नाही, पण प्रॅक्टिसचा हक्क अबाधित

परिपत्रकात पुढे स्पष्ट करण्यात आले आहे की, एआयबीई परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नोंदणीच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी दिला जातो. या दोन वर्षांत नवख्या वकिलांना बार असोसिएशनचे तात्पुरते सदस्यत्व मिळते. मात्र, परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत त्यांना बार असोसिएशनच्या निवडणुकीत मतदान करण्याचा, निवडणूक लढवण्याचा किंवा कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचा अधिकार असणार नाही. निवडणुकीचे अधिकार नसले तरी त्यांच्या प्रत्यक्ष वकिलीच्या अधिकारावर त्याचा कोणताही परिणाम होत नाही.

**दोन वर्षांत परीक्षा न दिल्यास परवाना स्थगित होणार**

जर एखाद्या वकिलाने दोन वर्षांच्या विहित मुदतीत एआयबीई परीक्षा उत्तीर्ण केली नाही, तर त्याचा वकिलीचा परवाना परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत स्थगित (सस्पेंड) राहील. अशा काळात त्या वकिलाला न्यायालयात वकिली करता येणार नाही. मात्र, परवाना स्थगित झाला तरी त्याची बार कौन्सिलमधील मूळ नोंदणी रद्द होत नाही. त्यानंतर जेव्हा तो वकील ही परीक्षा उत्तीर्ण होईल, तेव्हा त्याची प्रॅक्टिस पूर्ववत सुरू होईल आणि त्यासाठी त्याला पुन्हा नव्याने नोंदणी करण्याची गरज भासणार नाही.

कोणत्याही बार असोसिएशनने किंवा न्यायालयाच्या रजिस्ट्रीने एआयबीई उत्तीर्ण झाले नाही या कारणावरून नवोदित वकिलांना वकालतनामा दाखल करण्यापासून किंवा प्रॅक्टिस करण्यापासून बेकायदेशीरपणे रोखू नये, असे निर्देश बीसीआयने दिले आहेत.

# नालसार विद्यापीठ विवाद: बार कौन्सिल अध्यक्षांची माघार आणि माफी

**नवी दिल्ली –**

नालसार विधी विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या पदवीप्रदान समारंभावरून निर्माण झालेल्या वादात अखेर बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय) आणि तिचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांना माघार घ्यावी लागली आहे. विद्यार्थ्यांवर सनद (लायसन्स) नाकारण्याबाबत जारी केलेले परिपत्रक मागे घेतल्यानंतर बार कौन्सिलने या प्रकरणी अधिकृतपणे दिलगिरी व्यक्त केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेनंतर आणि कायदे क्षेत्रातील वाढत्या विरोधानंतर या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले होते.

काही दिवसांपूर्वी नालसार विद्यापीठाच्या २०२६ च्या तुकडीतील विद्यार्थ्यांनी एका वक्त्याच्या विरोध दर्शवत पदवीप्रदान समारंभाबाबत आपल्या भावना विद्यापीठ प्रशासनासमोर मांडल्या होत्या. या घडामोडीनंतर बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मनन कुमार मिश्रा यांनी एक परिपत्रक जारी करून संबंधित विद्यार्थ्यांवर कारवाईचा इशारा दिला होता, तसेच त्यांना

**सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेनंतर वादावर पडदा**

वकिलीची सनद न देण्याबाबत भूमिका घेतली होती. या निर्णयावर कायदे क्षेत्रासह विविध सामाजिक संस्था आणि विद्यार्थी संघटनांकडून तीव्र आक्षेप घेण्यात आला.

**न्यायालयाची स्पष्ट भूमिका आणि बार कौन्सिलची माघार**

हे प्रकरण समोर आल्यानंतर आणि सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर, हा विषय विद्यार्थी आणि संबंधित संस्थांमधील असून बार कौन्सिलने यात हस्तक्षेप करण्याची गरज नव्हती, अशी भूमिका स्पष्ट करण्यात आली. विद्यार्थ्यांना लोकशाही मार्गाने आपले मत आणि भावना मांडण्याचा पूर्ण अधिकार असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

न्यायालयाच्या या भूमिकेनंतर बार कौन्सिल ऑफ इंडियाला आपले परिपत्रक पूर्णपणे मागे घ्यावे लागले. त्यानंतर आयोजित करण्यात आलेल्या बीसीआयच्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या भावना दुखावल्याबद्दल अधिकृतपणे खेद व्यक्त करण्यात आला.

**विद्यापीठाची नोटीस आणि राजकीय शांतता**

दरम्यान, या प्रकरणात नालसार विद्यापीठ प्रशासनानेही भूमिका घेत बार कौन्सिलला नोटीस पाठवली आहे. परस्पर अशा प्रकारचे परिपत्रक कोणत्या अधिकारात काढण्यात आले, याबाबत विद्यापीठाने विचारणा केली असून कायदेशीर बाबींची चाचपणी सुरू केली आहे.

या संपूर्ण प्रकरणात राजकीय वर्तुळातून मात्र सावध भूमिका घेण्यात आल्याचे पाहायला मिळाले. सत्ताधारी अथवा विरोधक या दोन्ही बाजूंकडून या विषयावर कोणतीही अधिकृत राजकीय वक्तव्ये करण्यात आली नाहीत. मात्र, या सर्व घडामोडींनंतर देशातील शैक्षणिक स्वायत्तता, विद्यार्थ्यांचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य आणि संस्थांची कार्यप्रणाली या मुद्द्यांवर पुन्हा एकदा शिक्षण आणि कायदे क्षेत्रात व्यापक चर्चेला उधाण आले आहे.

# 'लिव्ह-इन' संबंध हे विवाहासारखेच; पालकांनी हस्तक्षेप टाळावा

**नवी दिल्ली –**

परस्पर संमतीने एकत्र राहणाऱ्या सज्ञान (प्रौढ) व्यक्तींचे 'लिव्ह-इन रिलेशनशिप' हे विवाहासारखेच असून, त्यांच्या या वैयक्तिक नात्यात पालक किंवा मित्रांनी कोणताही हस्तक्षेप करू नये, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. दोन सज्ञान व्यक्तींना स्वतःच्या पसंतीचा जोडीदार निवडण्याचा आणि त्याच्यासोबत राहण्याचा पूर्ण घटनात्मक अधिकार आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

लिव्ह-इन पद्धतीमध्ये राहणाऱ्या एका प्रेमी युगुलाला मुलीच्या कुटुंबाकडून सातत्याने धमक्या मिळत असल्याच्या प्रकरणात न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने या जोडप्यास पोलीस संरक्षण पुरवण्याचे निर्देश देताना सांगितले की, संमतीने लग्न करणाऱ्या प्रौढांचे विवाह हे जात, धर्म, पंथ किंवा सामाजिक पूर्वग्रह यांचा विचार न करता ग्राह्य धरले जातात. सामाजिक नैतिकतेच्या नावाखाली

**दिल्ली उच्च न्यायालय**



एखाद्या व्यक्तीच्या मूलभूत स्वातंत्र्यावर गदा आणणे म्हणजे तिला तिच्या स्वतंत्र अस्तित्वापासून वंचित ठेवण्यासारखे आहे.

या प्रकरणात मुलीचे वडील आणि भाऊ त्यांच्या या संबंधांना तीव्र विरोध करत होते तसेच दोघांना हिंसाचाराची धमकी देत होते. जोडप्याने यापूर्वी स्थानिक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती, मात्र त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. याची दखल घेत न्यायालयाने संबंधित पोलिसांना या जोडप्याच्या जीविताचे संरक्षण सुनिश्चित करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

# वकिलांवर बँकिंग क्षेत्रात सरसकट बंदी किंवा 'ब्लॅकलिस्ट' नको

**नवी दिल्ली –**
बँक किंवा वित्तीय संस्थांना एखाद्या वकिलाची सेवा नको असल्यास त्याला आपल्या पॅनेलवरून हटवण्याचा अधिकार नक्कीच आहे. मात्र, केवळ चुकीचा कायदेशीर सल्ला दिला किंवा कामात हलगर्जीपणा झाला या कारणास्तव संबंधित वकिलाला संपूर्ण बँकिंग क्षेत्रात सरसकट काळ्या यादीत टाकणे किंवा 'कॉशन-लिस्ट' जारी करणे बेकायदेशीर आहे, असा महत्त्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. वकिलाच्या व्यावसायिक गैरवर्तनाची किंवा हलगर्जीपणाची चौकशी करण्याचे आणि त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे कायदेशीर अधिकार केवळ बार कौन्सिलकडेच आहेत, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल



'अजय विज विरूद्ध इंडियन बँक्स असोसिएशन आणि इतर' या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला. न्यायाधीशांच्या खंडपीठाने नमूद केले की, वकिलांचे व्यावसायिक स्वातंत्र्य आणि स्वायत्तता टिकवून ठेवणे न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. एखाद्या प्रकरणात कायदेशीर सल्ला चुकला किंवा निष्काळजीपणाचा आरोप झाला, तरी थेट बँकिंग उद्योगातूनच वकिलाला बंदी घालणे किंवा त्याचे नाव इतर बँकांना देणे योग्य नाही. वकिलांवर कारवाई करायची असल्यास 'ॲडव्होकेट्स ॲक्ट'नुसार बार कौन्सिलकडेच दाद मागावी लागेल.

**सतत कायदेशीर शिक्षण आणि राष्ट्रीय विधी अकादमीचा प्रस्ताव**

या निकालादरम्यान सर्वोच्च न्यायालयाने वकिलांच्या व्यावसायिक गुणवत्तेवर आणि अभ्यासावर भर देत महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली आहेत. वकिलांसाठी 'सतत कायदेशीर शिक्षण' (कंटिन्यूइंग लीगल एज्युकेशन) अत्यंत गरजेचे असल्याचे सांगत, वकिलांच्या प्रशिक्षण व गुणवत्तेसाठी 'राष्ट्रीय विधी अकादमी' (नॅशनल लीगल ॲकॅडमी) स्थापन करण्याबाबत विचार करावा, असे प्रस्तावित केले आहे.

या विषयावर बार कौन्सिल ऑफ इंडियाने आपली भूमिका स्पष्ट करावी आणि प्रतिज्ञापत्र दाखल करावे, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे या प्रकरणात आगामी काळात बार कौन्सिलकडून काय पावले उचलली जातात आणि राष्ट्रीय विधी अकादमीबाबत काय अंतिम निर्णय होतो, याकडे संपूर्ण कायदे क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

## नवीन हिंद ग्रुप ऑफ स्कूल्समध्ये स्वातंत्र्यदिन उत्साहात

**पुणे** – कराची एज्युकेशन सोसायटीच्या बी. टी. शाहानी नवीन हिंद ग्रुप ऑफ स्कूल्स अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये ८० वा स्वातंत्र्यदिन सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे प्रदर्शन करण्यासोबतच व्यसनमुक्ती आणि आगामी बोर्ड परीक्षांमध्ये गैरप्रकार न करण्याची सामूहिक शपथ घेतली.

शाळेच्या प्रांगणात आयोजित या सोहळ्याची सुरुवात संस्थेचे मानद सचिव दीपक रामनानी यांच्या उपस्थितीने झाली. आर.एस.पी. पथकाच्या विद्यार्थ्यांनी पाहुण्यांना दिमाखदार 'गार्ड ऑफ ऑनर' दिला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडल्यानंतर राष्ट्रगीत आणि राज्यगीताच्या सुरांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला.

मुख्याध्यापिका कंचन लुल्ला यांनी स्वागतपर भाषण केले, तर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका कविता देशपांडे यांनी आभार मानले.

---

# हिंदू सण-उत्सवांतील ध्वनिक्षेपक निर्बंधांवरून शिवसेना आक्रमक

**पुणे** – नागपंचमी उत्सवा दरम्यान ध्वनिक्षेपकांवर घालण्यात आलेल्या कडक निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर आगामी दहीहंडी, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवाच्या काळात प्रशासनाने व्यवहार्य भूमिका घ्यावी, अशी मागणी करत शिवसेनेच्या शिष्टमंडळाने पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेतली. कायद्याचा सन्मान राखतानाच धार्मिक सण-उत्सवांचा उत्साह कायम राहिला पाहिजे, असा सूर या वेळी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आळवला.

मध्यवर्ती पुण्यातील नागपंचमीच्या पारंपरिक उत्सवात ध्वनिक्षेपकांच्या वापरावर अचानक कडक निर्बंध लादण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या पार्श्वभूमीवर शिवसेनेने पोलीस प्रशासनाला सविस्तर निवेदन सादर केले. ध्वनिक्षेपकांचा अतिरेक, मोठमोठ्या स्पीकरच्या भिंती किंवा त्रासदायक फ्लॅश साऊंडला आमचा पाठिंबा नाही; मात्र सरसकट कडक निर्बंध लादणे अयोग्य आहे. पुण्याच्या गणेशोत्सवाला मोठी ऐतिहासिक व सामाजिक परंपरा असून, या काळात अनेक घटकांना आर्थिक आधार मिळतो, त्यामुळे प्रशासनाने सामाजिक व सांस्कृतिक भान ठेवून निर्णय घ्यावा, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.

शिवसेनेच्या भावनांची दखल

## पोलीस आयुक्तांना दिले निवेदन

घेत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शिष्टमंडळाशी सकारात्मक चर्चा केली. 'मी तुमच्या भावनांची कदर करतो; मात्र शहरात डीजेचा वाढता उन्माद रोखणे आणि नागरिकांचे आरोग्य जपणे ही आमची प्राथमिकता आहे,' असे स्पष्ट मत पोलीस आयुक्तांनी व्यक्त केले. या विषयावर लवकरात लवकर सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संघटना व गणेश मंडळांची संयुक्त बैठक घेऊन सामोपचाराने मार्ग काढला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

कायद्याचा मान राखून प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याची तयारी दर्शवत, निर्बंध सर्वांना मान्य होतील अशा व्यवहार्य चौकटीत असावेत, अशी भूमिका शिवसेनेने मांडली. या भेटीदरम्यान शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख गजानन थरकुडे, संजय मोरे, युवासेना शहराध्यक्ष युवराज पारिख, संघटक राजेंद्र शिंदे, प्रसिद्धी प्रमुख अनंत घरत, विभाग प्रमुख चंदन साळुंके, मकरंद पेठकर, परेश खांडके, प्रतीक आल्हाट, सुनील गायकवाड, अमर काची आणि शिवाजी मेलकरी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# तीन वर्षांच्या विधी अभ्यासाची पहिली प्रवेश यादी जाहीर

**पुणे** – राज्यातील तीन वर्षीय विधी अभ्यासक्रमाच्या (एलएलबी) केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची (कॅप) पहिली निवड यादी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे जाहीर करण्यात आली आहे. या पहिल्या फेरीत राज्यातील १४ हजार ९४८ विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेशाची संधी मिळाली असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना गुरुवारी (ता. २०) ते शनिवारी (ता. २२) दरम्यान संबंधित महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्यभरातून ४८ हजार ७५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४० हजार ४०३ विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत महाविद्यालयांचे पसंतीक्रम (ऑप्शन फॉर्म) भरले होते. त्यामुळे पहिल्या फेरीच्या जागा वाटपासाठी केवळ पसंतीक्रम भरलेल्या याच ४० हजार ४०३ विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला आहे.

राज्यात तीन वर्षांच्या विधी अभ्यासक्रमासाठी २१९ महाविद्यालयांमध्ये एकूण ११ हजार ३९६ जागा उपलब्ध आहेत. या उपलब्ध जागांच्या तुलनेत पहिल्या फेरीत १४ हजार ९४८ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुदतीत प्रवेश निश्चित न करणाऱ्या विद्यार्थ्यांचे दावे पुढील फेऱ्यांसाठी गृहीत धरले जातील, त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळेत कागदपत्र पडताळणी करून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# धर्मादाय कायद्यातील नवीन सुधारणांवरून संस्थांच्या प्रशासनात संदिग्धता

**पुणे**– महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मध्ये राज्य शासनाने केलेल्या अमूलाग्र सुधारणांनंतर सध्या धर्मादाय संस्था आणि ऐतिहासिक देवस्थान ट्रस्टच्या प्रशासकीय रचनेबाबत काहीशी संदिग्धता निर्माण झाली आहे. या नवीन कायद्यानुसार दिवाणी व जिल्हा न्यायालयांना ट्रस्ट नियमनाचे असलेले अधिकार संपुष्टात आणून ते धर्मादाय आस्थापनेतील अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले आहेत. मात्र, या तरतुदींच्या अंमलबजावणीवरून कायदेशीर आक्षेप नोंदवले जात आहेत.

नवीन कलम ५० 'ब' नुसार एखाद्या ट्रस्टसाठी नियमावली (स्कीम) तयार करणे, त्यात सुधारणा करणे अथवा विश्वस्त नेमण्याचे दिवाणी व जिल्हा न्यायालयांचे अधिकार आता धर्मादाय आयुक्तांकडे आले आहेत. या पार्श्वभूमीवर विधी व न्याय विभागाने ३० मे रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार, ज्या १९ देवस्थान ट्रस्टवर पूर्वी दिवाणी किंवा जिल्हा न्यायाधीश हे पदसिद्ध विश्वस्त वा अध्यक्ष होते, त्यांच्या जागी सह धर्मादाय आयुक्त किंवा उपायुक्त/सहाय्यक आयुक्तांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

या संदर्भात पब्लिक ट्रस्ट प्रॅक्टीशनर्स असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. शिवराज कदम जहागिरदार यांनी

## कायदेतज्ज्ञांचा महत्त्वाचा आक्षेप

या तरतुदीतील तांत्रिक मुद्द्याकडे लक्ष वेधले आहे. राज्यभरातील अनेक पुरातन देवस्थानांसाठी तत्कालीन न्यायालयांनी सुमारे शंभर ते दीडशे वर्षांपूर्वी नियमावली तयार केली होती. १९५० चा ट्रस्ट कायदा आल्यानंतरही या संस्थांची जुनीच नियमावली कायम ठेवण्यात आली होती. त्यामुळे ज्या देवस्थानांवर न्यायाधीश हे स्वतः पदसिद्ध विश्वस्त किंवा अध्यक्ष होते, तिथे धर्मादाय अधिकाऱ्यांनी पदभार स्वीकारणे योग्य ठरते; परंतु ज्या ट्रस्टबाबत न्यायालयांकडे केवळ 'विश्वस्त मंडळ निवडण्याचे' अधिकार होते, तिथे धर्मादाय अधिकाऱ्यांनी स्वतः विश्वस्त किंवा अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारणे कायदेशीरदृष्ट्या अयोग्य ठरेल, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. अशा प्रकारच्या देवस्थानांवर जर धर्मादाय अधिकारी विद्यमान विश्वस्त मंडळाकडून चुकीच्या पद्धतीने पदभार काढून घेत असतील, तर हा कायदेशीर फरक प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

## संविधानाची प्रस्तावना

# लोकशाहीचा मुख्य जाहीरनामा

भारत हे जगातील सर्वांत मोठे लोकशाही राष्ट्र आहे आणि या लोकशाहीचा खरा आत्मा म्हणजेच आपले 'भारतीय संविधान'. सामान्य माणसाचे जीवन, त्यांचे मूलभूत अधिकार, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय यांचा पाया संविधानावर रचला गेला आहे. मात्र, आजही आपल्या देशातील अनेक नागरिकांना, तरुणांना आणि विद्यार्थ्यांना स्वतःच्या कायदेशीर हक्कांची व कर्तव्यांची पुरेशी माहिती नसते. कायदा आणि संविधान म्हटले की सामान्य माणसाला क्लिष्टता, कठीण कलमे आणि न्यायालये आठवतात.

हाच दुरावा दूर करण्यासाठी आणि संविधानातील मूल्ये अत्यंत सोप्या, रंजक आणि दैनंदिन जीवनाला स्पर्श करणाऱ्या भाषेत वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आपण 'संविधानाची वारी – हक्क आणि कर्तव्यांची सफर' हे साप्ताहिक सदर सुरू करत आहोत. पुढील १५० भागांच्या या प्रवासात आपण संविधानाची निर्मिती, मूलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे, महत्त्वाच्या घटनादुरुस्त्या आणि न्यायालयांचे ऐतिहासिक निकाल यांचा सखोल व सोप्या भाषेत आढावा घेणार आहोत. संविधानाची ही वैचारिक 'वारी' प्रत्येक नागरिकाला कायदेशीरदृष्ट्या साक्षर आणि जागरूक बनवेल, हाच या साप्ताहिकाचा मुख्य उद्देश आहे.

## संविधानाची वारी – हक्क आणि कर्तव्यांची सफर

आपण जेव्हा कोणतेही पुस्तक उघडतो, तेव्हा सुरुवातीला त्याची 'प्रस्तावना' किंवा 'उद्देशिका' दिलेली असते. भारतीय संविधानाची उद्देशिका म्हणजे आपल्या देशाच्या आत्म्याचा आरसा आणि संविधानाचे 'हृदय' मानले जाते. सर्वोच्च न्यायालयानेही अनेक निकालांमध्ये स्पष्ट केले आहे की, जिथे संविधानातील एखाद्या कलमाचा अर्थ स्पष्ट होत नाही, तिथे ही उद्देशिका मार्गदर्शक दीपस्तंभासारखी काम करते.

भारतीय संविधानाची सुरुवात 'आम्ही भारताचे लोक...' या शब्दांनी होते. हे चार शब्द अत्यंत शक्तिशाली आहेत. याचा अर्थ असा की, देशात सर्वोच्च सत्ता ही कोणत्याही राजाची, राजकीय पक्षाची किंवा सरकारची नसून ती 'भारतातील जनतेची' आहे. संविधानाला ताकद आणि अधिकार या देशातील सामान्य नागरिकांनीच दिलेले




आहेत.

उद्देशिकेत भारताचे स्वरूप 'सर्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य'असे स्पष्ट केले आहे.

सार्वभौम – भारत आता कोणत्याही परकीय सत्तेच्या नियंत्रणाखाली नाही. देश आपले निर्णय घेण्यास पूर्णपणे स्वतंत्र आहे.

समाजवादी – देशातील आर्थिक विषमता कमी करणे आणि सर्व घटकांना विकासाची समान संधी देणे.

धर्मनिरपेक्ष – राज्याचा स्वतःचा असा कोणताही एक धर्म नसेल. सर्व धर्मांना समान संरक्षण व आदर दिला जाईल.

लोकशाही गणराज्य – देशाचा प्रमुख (राष्ट्रपती) किंवा सरकार हे वंशपरंपरेने निवडले जाणार नाही, तर ते जनतेद्वारे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निवडले जाईल.

याशिवाय, प्रत्येक नागरिकाला 'न्याय' (सामाजिक, आर्थिक व राजकीय), 'स्वातंत्र्य' (विचार, अभिव्यक्ती, श्रद्धा व उपासनेचे), 'समता' (दर्जाची व संधीची) आणि 'बंधुता' देण्याचे वचन ही उद्देशिका देते.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने हे संविधान स्वीकृत केले. संविधानाची ही उद्देशिका केवळ कागदावरचे शब्द नसून, ते प्रत्येक भारतीयाचे जीवनमान उंचावणारे अभिवचन आहे. पुढील भागात आपण हे महान संविधान निर्माण कसे झाले आणि त्यामागील इतिहास काय होता, याचा रंजक आढावा घेणार आहोत.

# आमदारांना अपात्र करण्याचा न्यायालयालाही अधिकार

### सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वपूर्ण टिप्पणी

**नवी दिल्ली** – आमदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार हा केवळ विधानसभा अध्यक्षांपुरताच मर्यादित नसून, असाधारण किंवा अपवादात्मक परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयही आमदारांना अपात्र ठरवू शकते, अशी अत्यंत महत्त्वपूर्ण टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे. शिवसेना (ठाकरे गट) अपात्रता प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने हे वक्तव्य केले.

सुनावणीदरम्यान ठाकरे गटातर्फे ज्येष्ठ वकील देवदत्त कामत यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, आमदार अपात्रतेबाबत निर्णय घेण्यात जेव्हा विधानसभा अध्यक्ष अपयशी ठरतात, तेव्हा न्यायालय त्यात निश्चितच हस्तक्षेप करू शकते. दहाव्या अनुसूचीचा



(पक्षांतर विरोधी कायदा) मूळ प्रभाव निष्प्रभ ठरवण्याची परवानगी अध्यक्षांना दिली जाऊ शकत नाही, असा दाखला देत त्यांनी यापूर्वीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निकालांचे संदर्भ दिले. फुटीर आमदारांनी पक्षांतर केले होते की नाही, याचा अंतिम निर्णय न्यायालयानेच घ्यावा, अशी विनंतीही त्यांनी केली.

या वेळी युक्तिवाद करताना ॲड. कामत म्हणाले की, राजकीय पक्ष आणि विधिमंडळ पक्ष या दोन वेगळ्या गोष्टी असून मूळ राजकीय पक्षालाच अधिक महत्त्व असते. निवडणूक आयोग ही केवळ एक न्यायाधिकरणासारखी संस्था आहे, ती सर्वोच्च न्याय देणारी संस्था नाही. विधानसभा अध्यक्षांनी आणि निवडणूक आयोगाने चुकीचे निर्णय दिल्यास ते फिरवण्याची अनेक उदाहरणे यापूर्वी घडली आहेत. त्यामुळे या प्रकरणात आमदारांचा कार्यकाळ संपला असला, तरी न्यायालयाचा निकाल अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असून, अपात्रतेबाबत न्यायालयानेच योग्य तो निर्णय देऊन दिलासा द्यावा, असा युक्तिवाद त्यांनी मांडला.

# तीन वर्षांच्या एलएलबी अभ्यासक्रमाची पहिली निवड यादी प्रसिद्ध

### सुमारे १५ हजार विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी

**पुणे** – राज्यातील तीन वर्षीय विधी (एलएलबी) अभ्यासक्रमाच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेची (कॅप) पहिली फेरीची निवड यादी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे  घोषित करण्यात आली आहे. या पहिल्या यादीनुसार राज्यातील १४ हजार ९४८ विद्यार्थ्यांना विविध विधी महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना गुरुवार (ता. २०) ते शनिवार (ता. २२) या कालावधीत मिळालेल्या महाविद्यालयात उपस्थित राहून आपला प्रवेश निश्चित करावा लागणार आहे.

या वर्षी तीन वर्षीय विधी अभ्यासक्रमासाठी राज्यभरातून तब्बल ४८ हजार ७५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४० हजार ४०३ विद्यार्थ्यांनी मुदतीत महाविद्यालयांचे पसंतीक्रम (ऑप्शन फॉर्म) भरले होते. त्यामुळे पहिल्या फेरीच्या जागा वाटपासाठी केवळ पसंतीक्रम नोंदवलेल्या याच विद्यार्थ्यांचा विचार करण्यात आला आहे.

राज्यात तीन वर्षांच्या एलएलबी अभ्यासक्रमासाठी एकूण २१९ महाविद्यालयांमध्ये ११ हजार ३९६ जागा उपलब्ध आहेत. या उपलब्ध जागांच्या तुलनेत पहिल्या फेरीत १४ हजार ९४८ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी देण्यात आली आहे. प्रवेशाची संधी मिळालेल्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या मुदतीत आपली आवश्यक कागदपत्रे पडताळून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रवेश परीक्षा कक्षाकडून करण्यात आले आहे.

# नैसर्गिक जलस्रोतांत यंदाही गणेशमूर्तींचे विसर्जन

## सहा फुटांवरील पीओपी मूर्तींबाबत उच्च न्यायालयाचे जुनेच धोरण कायम



**मुंबई** – प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) गणेशमूर्तीबाबत राज्य सरकारचे गेल्या वर्षीचे धोरण यंदाही लागू राहील, असे उच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले. यामुळे सहा फुटांपेक्षा जास्त उंची असणाऱ्या पीओपी गणेशमूर्तींचे विसर्जन यंदाही नैसर्गिक जलस्रोतांमध्येच करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

पीओपीच्या गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करण्यास विरोध करणाऱ्या जनहित याचिकेवर न्यायालयात प्रदीर्घ सुनावणी पार पडली. या प्रकरणी न्यायालयाने शुक्रवारी (ता. १४) आपला निकाल राखून ठेवला होता. तसेच अंतिम निकाल येईपर्यंत ९ जूनच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास सांगितले होते. मात्र, या आदेशाची लेखी प्रत उपलब्ध न झाल्यामुळे ९ जून की २४ जुलैच्या आदेशाची अंमलबजावणी करायची, यावरून संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारतर्फे महाधिवक्ता मिलिंद साठे यांनी न्यायालयाकडे याबाबत स्पष्टता देण्याची विनंती केली होती.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठापुढे यावर सुनावणी झाली. न्यायालयाने अंतिम निर्णय येईपर्यंत २४ जुलैच्या निर्णयाचीच अंमलबजावणी केली जाईल, असे स्पष्ट केले. २४ जुलैच्या या आदेशानुसार, सहा फुटांपेक्षा लहान मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावांमध्ये करणे बंधनकारक करण्यात आले आहे, तर सहा फुटांवरील मोठ्या गणेशमूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्रोतांमध्ये करण्यास परवानगी देण्यात आली होती. न्यायालयाच्या या स्पष्टीकरणामुळे यंदाच्या गणेशोत्सवातील विसर्जनाबाबत निर्माण झालेला संभ्रम अखेर दूर झाला आहे.

# आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करण्याचे आवाहन

**पुणे** – आंतरराष्ट्रीय न्याय दिनाचे औचित्य साधून न्यायदानाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या सर्व घटकांचे, भागधारकांचे आणि कायदेतज्ज्ञांचे आभार मानण्यात येत आहेत. कायद्याचे राज्य आणि न्यायव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सर्वच पातळ्यांवर बांधिलकी आणि कृतीतून प्रयत्न वाढवण्याची गरज या निमित्ताने अधोरेखित केली जात आहे.

काळाच्या ओघात आणि बदलत्या गरजांनुसार न्यायव्यवस्थेतही वेळेनुसार सुधारणा व विधायक संवाद होणे आवश्यक आहे. केवळ दोषारोप करण्यापेक्षा सर्व घटकांनी आपापली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडल्यास न्यायव्यवस्थेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि जनतेचा विश्वास




अधिक वाढीस लागेल.

न्यायप्रक्रियेत केवळ वादातील पक्षांचे समाधान महत्त्वाचे नसून, व्यापक सामाजिक समाधानही तितकेच गरजेचे असते. न्यायालयांच्या निर्णयांचा आदर करणे आणि न्यायाचे मूळ उद्दिष्ट साध्य होईल अशा दिशा शोधणे ही काळाची गरज आहे. न्यायव्यवस्थेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी सर्व घटकांनी सकारात्मक आणि आशेचा दृष्टिकोन ठेवून एकत्रित योगदान द्यावे, असा सूर आंतरराष्ट्रीय न्याय दिनानिमित्त व्यक्त होत आहे.

# पिंपळवंडीत चिमुकलीवर अत्याचार करून हत्या

**पिंपळवंडी (विशेष प्रतिनिधी)** – जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे एका दहा वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण जुन्नर तालुका हादरला असून नागरिकांमधून संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणी पोलिसांनी साहिल खैरे (वय २५) या संशयित आरोपीला ताब्यात घेतले असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित चिमुकली ही एका शेतमजूर कुटुंबातील आहे. आरोपीने पूर्वओळखीचा गैरफायदा घेऊन तिला गाठले आणि तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर स्वतःचा गुन्हा लपवण्यासाठी तिचा गळा आवळून हत्या केल्याचा प्राथमिक आरोप आहे. घटनेची माहिती मिळताच पिंपळवंडी आणि परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने घटनास्थळी आणि पोलीस ठाण्यासमोर एकत्र आले. या घटनेतील नराधमाला कठोरात कठोर शिक्षा करून तात्काळ फाशी देण्यात यावी, अशी आक्रमक भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी गुरुवारी रात्री उशिरा स्वतः घटनास्थळी भेट देऊन तपासाची पाहणी केली. या वेळी अत्यंत संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षकांना घेराव घालत आपल्या तीव्र



## परिसरात तीव्र संताप, आरोपीला फाशीची मागणी

भावना व्यक्त केल्या. आरोपीला कुठलीही दयामाया न दाखवता कडक कारवाई करण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

सध्या पिंपळवंडी परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी गावात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा सर्व बाजूंनी अधिक तपास करत असून लवकरात लवकर दोषारोपपत्र दाखल केले जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष निवडीला आव्हान

## सच्चिदानंद सिंह यांनी बजावली अंतिम कायदेशीर नोटीस

**मुंबई** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी झालेल्या निवडीवरून पक्षांतर्गत वाद चिघळला असून, पक्षाचे राष्ट्रीय सचिव सच्चिदानंद सिंह यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीला आव्हान दिले आहे. यासंदर्भात त्यांनी १५ दिवसांची अंतिम कायदेशीर रिमाइंडर नोटीस बजावली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी २६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेली निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचा दावा सच्चिदानंद सिंह यांनी केला आहे. त्यांच्या वतीने वकिलांमार्फत १७ ऑगस्ट रोजी ही रिमाइंडर नोटीस पाठवण्यात आली असून, ती सुनेत्रा पवार, पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि राष्ट्रीय सरचिटणीस ब्रजमोहन श्रीवास्तव यांना बजावण्यात आली आहे. यापूर्वी सिंह यांनी ९ जुलै २०२६ रोजी याच प्रकरणी कायदेशीर नोटीस पाठवली होती. त्या नोटीसमध्ये २६ फेब्रुवारीला झालेली राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक रद्द करण्यात यावी, तसेच तदनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सादर केलेले सर्व संबंधित अर्ज व कागदपत्रे मागे घेण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, संबंधित नेत्यांनी या पहिल्या नोटीसीला निर्धारित मुदतीत कोणतेही उत्तर न दिल्याने ही नवी आणि अंतिम नोटीस बजावण्यात आल्याचे सिंह यांनी म्हटले आहे.

# प्रांताधिकारी कार्यालयातील एजंटगिरी न थांबल्यास कठोर कारवाई

## महसूलमंत्र्यांचा इशारा



**पुणे** – हवेली आणि खेड प्रांताधिकारी (उपविभागीय अधिकारी) कार्यालयांमध्ये वाढलेल्या एजंटगिरीची गंभीर दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधितांवर कडक कारवाईचा इशारा दिला आहे. महसूल कार्यालयांमध्ये खासगी व्यक्तींमार्फत होणारे गैरव्यवहार आणि आर्थिक वसुली कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

जमिनीचे वाद, सुनावण्यांचे निकाल आणि विविध फायलींच्या देवाणघेवाणीसाठी प्रांताधिकारी कार्यालयांत अधिकृत कर्मचाऱ्यांऐवजी खासगी माणसे व एजंट सक्रिय असल्याच्या तक्रारी महसूलमंत्र्यांकडे प्राप्त झाल्या आहेत. याशिवाय, गौणखनिज वाहतुकीवर कारवाईच्या नावाखाली होणारा थेट हस्तक्षेप आणि पक्षकारांकडून केली जाणारी वसुली यावरही त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या सर्व तक्रारींबाबत लवकरच शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा करून वस्तुस्थिती जाणून घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**चौकशी करून दोषींवर कारवाई करणार - बावनकुळे**

'हवेली आणि खेड प्रांताधिकाऱ्यांचे काही खासगी एजंट सुनावण्या व कामकाजामध्ये हस्तक्षेप करत असल्याच्या गंभीर तक्रारी आल्या आहेत. या संपूर्ण प्रकाराची मी स्वतः माहिती घेत असून, सर्वसामान्यांची आणि शेतकऱ्यांची पिळवणूक अजिबात सहन केली जाणार नाही. या प्रकरणी सविस्तर चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल,' असे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहे.

हल्ली संपूर्ण राज्यभरात प्रत्येक तहसील कार्यालय असो किंवा कुठलेही शासकीय कार्यालय असो, त्या ठिकाणी सरळ मार्गाने काम न होता प्रत्येक कार्यालयाच्या बाहेर काही एजंट हे अनधिकृतपणे काम करत असतात. यामुळे भ्रष्टाचार फोफावला आहे. यावर अनेक नागरिकांच्या तक्रारी असतात. अनेक नागरिक या तक्रारी वरिष्ठांपर्यंत पोहोचवतात देखील. परंतु, वरिष्ठ अधिकारी देखील याकडे सहज कानाडोळा करतात. त्यामुळे अशा एजंटांवर वचक आणण्यासाठी महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. बावनकुळे यांच्या या निर्णयाचे नागरिकांमधून स्वागत करण्यात येत आहे.

# खड्डयांत रुतलेले 'विद्येचे माहेरघर'

# पुण्यातील रस्ते, प्रशासकीय अनास्था आणि संतापलेली जनता

**'विद्येचे माहेरघर', 'सांस्कृतिक राजधानी' आणि 'आयटी हब' अशी अनेक विशेषणे मिरवणाऱ्या पुणे शहराची सध्याची ओळख दुर्दैवाने 'खड्डयांचे शहर' अशी झाली आहे. पावसाळा सुरू झाला की पुण्यातील रस्त्यांची होणारी चाळण, ठिकठिकाणी पडणारे खड्डे, त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी आणि त्यात भरडणारा सामान्य नागरिक हे आजच्या पुण्याचे वास्तव बनले आहे. कोट्यवधी रुपयांचा अर्थसंकल्प असलेल्या पुणे महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे आणि प्रशासकीय अनास्थेमुळे आज संपूर्ण पुणेकर नागरिक संतापाच्या गर्तेत सापडले आहेत.**



### रस्त्यांची दुरवस्था: ठेकेदार आणि प्रशासनाची हातमिळवणी

पुण्यातील पेठ भागांपासून ते अगदी नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांपर्यंत आणि हिंजवडी, खराडीसारख्या अत्याधुनिक आयटी पार्क्सपर्यंत, रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट आहे. पावसाच्या पहिल्याच सरींसोबत नवीन डामरीकरण केलेले रस्ते वाहून जातात. वर्षानुवर्षे हेच चित्र पाहायला मिळते.

या समस्येच्या मुळाशी आहे महापालिका प्रशासन आणि ठेकेदार यांच्यातील कथित साटेलोटे. दरवर्षी रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी, रि-सरफेसिंगसाठी आणि खड्डे बुजवण्यासाठी शेकडो कोटी रुपयांच्या निविदा निघतात. मात्र, वापरल्या जाणाऱ्या डांबराचा आणि खडीचा दर्जा अत्यंत निकृष्ट असतो. पावसाळ्यात पडलेले खड्डे बुजवण्यासाठी 'कोल्ड मिक्स' किंवा खडी-मातीचा वापर केला जातो, जो पहिल्याच पावसात किंवा अवजड वाहतुकीमुळे पुन्हा उखडला जातो. कामाची गुणवत्ता तपासणारी यंत्रणा कागदावरच मर्यादित राहिल्याने ठेकेदारांचे फावते आणि त्याचा थेट फटका नागरिकांना बसतो.

### खोदकामाचा कधीही न संपणारा 'यज्ञ'

पुण्यातील रस्त्यांची चाळण होण्याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे विविध प्राधिकरणांमध्ये नसलेला समन्वय. महापालिका, ड्रेनेज विभाग, पाणीपुरवठा विभाग, महावितरण, इंटरनेट सेवा पुरवठादार कंपन्या आणि स्मार्ट सिटी मिशन या सर्वांमध्ये आपापसात कसलाही समन्वय नाही.

एका विभागाने रस्ता नव्याने तयार केला की लगेच दुसरा विभाग केबल किंवा पाईपलाईन टाकण्यासाठी तो रस्ता खोदतो. 'खोदा आणि विसरून जा' अशा पद्धतीचा कारभार सुरू आहे. पावसाळ्यापूर्वी सर्व खोदकामे बंद करण्याचे प्रशासनाचे नियमावलीतील आदेश केवळ कागदावरच राहतात. पावसाळ्यात या अर्धवट बुजवलेल्या खड्डयांमध्ये पाणी साचून रस्ते अधिक धोकादायक बनतात.

### वाहतूक कोंडी, अपघात आणि आरोग्यविषयक समस्या

खड्डयांमुळे पुण्यात दररोज किलोमीटर लांब वाहनांच्या रांगा लागतात. जे अंतर पार करायला १० ते १५ मिनिटे लागायला हवीत, तिथे तास-दोन तास ताटकळत राहावे लागते. या वाहतूक कोंडीमुळे इंधनाची मोठी नासाडी होते आणि प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढते.

सर्वात गंभीर बाब म्हणजे या खड्डयांमुळे होणारे जीवघेणे अपघात. खड्डा चुकवण्याच्या नादात दुचाकीस्वार घसरून पडणे, मागून येणाऱ्या अवजड वाहनाखाली येणे अशा अनेक दुर्घटना घडल्या आहेत. अनेक नागरिकांना यामुळे आपले प्राण गमवावे लागले आहेत, तर कित्येक जण कायमचे अपंग झाले आहेत. याशिवाय, खड्डयांमुळे होणाऱ्या पाठीच्या, मणक्याच्या आणि मानेच्या विकारांनी दुचाकीस्वार ग्रस्त झाले आहेत. लहान मुले, गरोदर महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी पुण्यातील रस्त्यांवरून प्रवास करणे म्हणजे एक दिव्यच बनले आहे.

### प्रशासकीय उत्तरदायित्वाचा अभाव

पुणे महापालिकेत सध्या लोकप्रतिनिधींची मुदत संपल्याने प्रशासकीय राजवट सुरू आहे. मात्र, सनदी अधिकाऱ्यांचा प्रशासनावरील वचक कमी झाल्याचे चित्र आहे. नागरिक जेव्हा तक्रार करतात, तेव्हा केवळ आश्वासने दिली जातात किंवा 'हेल्पलाईन' आणि 'ॲप'वर तक्रार नोंदवण्याचा सल्ला दिला जातो. प्रत्यक्षात मात्र खड्डे बुजवले जात नाहीत.

रस्त्यांच्या या वाईट अवस्थेला जबाबदार असणाऱ्या एकाही अधिकाऱ्यावर किंवा कंत्राटदारावर आजपर्यंत ठोस आणि दंडात्मक कारवाई झालेली नाही. कंत्राटदारांना 'ब्लॅकलिस्ट' न करणे, त्यांच्याकडून 'डिफफेक्ट लायबिलिटी पिरियड' अंतर्गत मोफत दुरुस्ती करून न घेणे, यामुळे प्रशासनाचे अपयश उघडे पडते. करदात्या नागरिकांच्या पैशांची ही उघडउघड उधळपट्टी आहे.

### जनतेचा वाढता रोष आणि आंदोलनाची भाषा

पुणेकर नागरिक एरवी सहनशील मानले जातात, परंतु आता त्यांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. रस्त्यांवर साचलेल्या पाण्यात झाडे लावून, खड्डयांची पूजा करून किंवा लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांचे निषेध फलक लावून नागरिक आपला राग व्यक्त करत आहेत. सोशल मीडियावर प्रशासनाविरोधात रोज तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. 'आम्ही नियमित मालमत्ता कर, रस्ता कर आणि इतर सर्व कर भरतो, मग आम्हाला सुरक्षित रस्ते का मिळत नाहीत?' असा थेट प्रश्न नागरिक विचारत आहेत. कर भरूनही पायाभूत सुविधा न मिळणे हा नागरिकांच्या हक्कांवर गदा आणणारा प्रकार आहे.

### काय आहे उपायांची दिशा?

**भविष्यात पुण्याला खड्डेमुक्त करायचे असेल, तर तात्पुरत्या मलमपट्टीऐवजी ठोस उपाययोजनांची गरज आहे:**

*** गुणवत्ता नियंत्रण व कडक कारवाई: रस्त्यांच्या बांधकामात आधुनिक तंत्रज्ञानाचा (उदा. मस्टिक डांबर किंवा क्रीटचे रस्ते) वापर करावा. रस्ता खराब झाल्यास संबंधित ठेकेदारावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्याला कायमचे काळ्या यादीत टाकावे.**

*** एकात्मिक प्राधिकरण : शहरातील सर्व रस्ते व खोदकामाच्या नियंत्रणासाठी एकच मध्यवर्ती प्राधिकरण असावे, जेणेकरून वारंवार होणारे खोदकाम थांबेल.**

*** थर्ड पार्टी ऑडिट : रस्ता तयार झाल्यावर आणि पावसाळ्यानंतर त्रयस्थ संस्थेकडून रस्त्यांचे स्ट्रक्चरल व क्वालिटी ऑडिट केले जावे.**

*** पारदर्शकता: प्रत्येक रस्त्याचा खर्च, कंत्राटदाराचे नाव आणि हमी कालावधी दर्शवणारे फलक रस्त्याच्या सुरुवातीला लावणे बंधनकारक करावे.**

**पुणे हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचे एक प्रमुख आर्थिक व शैक्षणिक केंद्र आहे. जागतिक पातळीवर शहराचा विस्तार होत असताना, येथील मूलभूत पायाभूत सुविधा मात्र कोलमडल्या आहेत. केवळ उड्डाणपूल आणि मेट्रोची स्वप्ने दाखवून शहराचा विकास होत नाही; सामान्य माणसाला रोज चालण्यासाठी सुरक्षित रस्ते देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रशासनाने आता झोपेतून जागे होऊन पुण्यातील रस्त्यांची अवस्था सुधारण्यासाठी युद्धपातळीवर काम करणे गरजेचे आहे, अन्यथा पुणेकरांच्या या संतापाचा उद्रेक प्रशासनाला महागात पडू शकतो.**

### सेवानिवृत्त मुख्याध्यापिकेचे थकबाकी प्रकरण

# पुणे पालिका आयुक्तांना न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

**पुणे : प्रतिनिधी**

सेवानिवृत्त मुख्याध्यापिकेचे निवृत्तीवेतन आणि व्याजाची थकबाकी देण्याच्या न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने पुणे महापालिका आयुक्तांना शुक्रवारी (ता. २१) न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याचे कडक आदेश दिले होते. न्यायालयाच्या या आक्रमक भूमिकेमुळे पालिका वतुर्ळात मोठी खळबळ उडाली आहे.

पुणे महापालिकेच्या सेवेतून निवृत्त झालेल्या मुख्याध्यापिका शशिकला काटे यांच्या प्रसूती रजा आणि वेतनवाढीची रक्कम महापालिकेने वसूल केली होती. प्रशासनाच्या या कारवाईविरोधात काटे यांनी ॲड. सचिन साळुंके यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने डिसेंबर २०२४ मध्येच ही वसूल केलेली रक्कम व्याजासह काटे यांना परत करण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र, दीर्घ कालावधी उलटूनही महापालिका प्रशासनाने या आदेशाची अंमलबजावणी केली नव्हती.

या दिरंगाईची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. शुक्रवारी सुनावणी सुरू होण्यापूर्वी थकबाकीची संपूर्ण रक्कम अदा करून त्याचा अनुपालन अहवाल सादर करावा; अन्यथा आयुक्तांनी स्वतः न्यायालयात हजर राहावे, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

दरम्यान, न्यायालयाच्या या इशाऱ्यानंतर महापालिका प्रशासन तत्पर झाले असून, 'शशिकला काटे यांच्या थकबाकीचा धनादेश (चेक) तयार करण्यात आला आहे आणि त्यांना तो देण्यासाठी कार्यालयात बोलावण्यात आले आहे,' अशी माहिती शिक्षण विभागाच्या उपायुक्त वसुंधरा बारवे यांनी दिली.

## सूर्यदत्त संस्थेतर्फे वीरपत्नींचा विशेष सन्मान

**पुणे :** सूर्यदत्त शिक्षण संस्थेच्या वतीने १४ ते २२ ऑगस्ट या कालावधीत आयोजित विशेष स्वातंत्र्यदिन उपक्रम सप्ताहाचा बावधन कॅम्पसमध्ये उत्साही वातावरणात प्रारंभ झाला. या सोहळ्यात देशाच्या रक्षणासाठी आत्मसमर्पण करणाऱ्या वीर जवानांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत ११ वीरपत्नींना 'वीर नारी सन्मान' प्रदान करून गौरवण्यात आले.

सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय चोरडिया आणि संस्थेच्या उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया यांच्या शुभहस्ते या सर्व वीरपत्नींचा सन्मान करण्यात आला. देशसेवेसाठी आपल्या पतीचे सर्वोच्च बलिदान स्वीकारणाऱ्या या वीरनारींचा त्याग व धैर्य समाजासाठी सदैव प्रेरणादायी आहे, अशी भावना या वेळी व्यक्त करण्यात आली.

या सोहळ्याचे औचित्य साधून प्रसिद्ध गायक जितेंद्र भुरुक आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ८० देशभक्तीपर गीतांचा विशेष संगीतमय कार्यक्रम सादर केला. या देशभक्तीपर सुरांनी संपूर्ण परिसर भारावून गेला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुनील धनगर यांनी केले.

# पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांचा सन्मान

**'अतिउत्कृष्ट सेवापदक' मिळाल्याबद्दल विविध क्षेत्रातून कौतुक**

**पुणे :** उल्लेखनीय व कर्तव्यदक्ष सेवेसाठी पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना केंद्रीय गृह मंत्रालयाचे अत्यंत मानाचे 'अतिउत्कृष्ट सेवापदक' जाहीर झाल्याबद्दल विविध राजकीय पक्षांचे लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याच वेळी उत्कृष्ट सेवेबद्दल सहपोलीस आयुक्त संजय दराडे यांचाही सन्मान करण्यात आला.

अमितेश कुमार यांनी पुणे पोलीस आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शहरातील गुन्हेगारीवर वचक निर्माण करणे, अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करणे आणि सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण करणे यावर विशेष भर दिला आहे. त्यांच्या या पारदर्शक व तत्पर कार्यपद्धतीमुळे पुणे पोलीस दलाची प्रतिमा अधिक उंचावली असून, पोलीस दलाबद्दलचा जनतेतील विश्वास वाढला असल्याची भावना सत्कार प्रसंगी मान्यवरांनी व्यक्त केली.



या विशेष सत्कार कार्यक्रमास माजी नगरसेवक ॲड. अय्युब शेख, माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, अजय भोसले, बाळासाहेब जानराव, राहुल डंबाळे, मिलिंद अहिरे आणि आबिद सय्यद आदी प्रमुख मान्यवर व कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## न्यायालयीन आदेश डावलून जमिनीची नांगरणी

**पुणे** – जमिनीच्या मालकीवरून दिवाणी न्यायालयात दावा प्रलंबित असताना, न्यायालयीन आदेशाचा थेट अवमान करत जमिनीची नांगरणी केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी दीपक सुभाष गोते, अमोल सुभाष गोते आणि कल्पना सुभाष गोते (सर्व रा. बाकरी, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून, लोणीकंद पोलीस ठाण्यात यासंबंधी नोंद करण्यात आली आहे.

या प्रकरणी प्रभाकर रामदास कामठे (वय ४८, रा. कामठे तालीमीसमोर, फुरसुंगी) यांनी लोणीकंद पोलिसांकडे तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी २०२१ पासून तक्रारदारांच्या जमिनीवर बेकायदेशीररीत्या ताबा मिळवून अतिक्रमण केल्याचा आरोप आहे. या जमिनीबाबत दिवाणी न्यायालयात खटला सुरू असून न्यायालयाने स्थगितीचे आदेश दिले होते. असे असतानाही आरोपींनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करत संबंधित जमिनीची नांगरणी केली.

तक्रारदार कामठे यांनी आरोपींच्या या कृतीला विरोध केला असता, आरोपींनी त्यांना अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी लोणीकंद पोलिसांनी न्यायालयाचा अवमान आणि धमकावल्याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास पोलीस करत आहेत.

# जंतरमंतर आंदोलनातील पोलीस कारवाईच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती

**सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय**

**नवी दिल्ली** – राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान जमावावर झालेला लाठीमार, पेलेट गन आणि इलेक्ट्रिक काठ्यांचा कथित वापर, तसेच साध्या वेषातील पोलिसांची तैनाती या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आर. सुभाष रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी समिती काम करणार आहे.

या उच्चस्तरीय समितीमध्ये पंजाब-हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती रविशंकर झा, दिल्ली उच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती शालिंदर कौर, सीबीआयचे माजी संचालक ऋषिकुमार शुक्ला आणि मेघालयचे माजी पोलीस महासंचालक एल. आर. बिश्नोई यांचा समावेश आहे. आंदोलकांवरील पोलीस कारवाईबरोबरच, आंदोलकांकडून पोलिसांवर झालेला हल्ला आणि सार्वजनिक मालमत्तेचे झालेले नुकसान या दोन्ही बाजूंची चौकशी ही समिती करणार आहे. समितीचा अंतरिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर पावले उचलली जातील, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# १०५ वर्षीय कैद्याची उर्वरित शिक्षा माफ

**वयाचा व प्रकृतीचा विचार करून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय**

**नवी दिल्ली** – पश्चिम बंगालमधील १०५ वर्षीय वृद्ध कैद्याला जन्मठेपेच्या उर्वरित शिक्षेतून सर्वोच्च न्यायालयाने मुक्त केले आहे. रसिकचंद्र मंडल असे या कैद्याचे नाव असून, त्यांचे वाढते वय आणि ढासळती प्रकृती विचारात घेऊन न्यायालयाने त्यांच्याविरोधातील खटला बंद करण्याचे आदेश दिले आहेत.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने हा ऐतिहासिक निर्णय दिला. मंडल यांचे वय आणि प्रकृतीची स्थिती पाहता त्यांना पुन्हा तुरुंगात ठेवण्याची कोणतीही आवश्यकता नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने त्यांचा अंतरिम जामीन कायम ठेवला.

सन १९२० मध्ये मालदा जिल्ह्यात जन्मलेल्या मंडल यांना १९९४ मध्ये एका खून प्रकरणात दोषी ठरवून जन्म ठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. या शिक्षेविरोधात त्यांनी कलकत्ता उच्च न्यायालयात आणि नंतर सर्वोच्च न्यायालयात अपील केले होते; मात्र दोन्ही ठिकाणी याचिका फेटाळण्यात आल्या होत्या. त्यानंतर २०२० मध्ये, वयोमानामुळे उद्भवलेल्या आजारांचे कारण देत मंडल यांनी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात नवीन याचिका दाखल केली. यावर नोव्हेंबर २०२४ मध्ये न्यायालयाने त्यांना अंतरिम जामीन मंजूर केला होता.

आज झालेल्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले की, मंडल यांच्या जन्मठेपेची मुदत अधिकृतपणे पूर्ण झाली नसली, तरी वयोमानामुळे त्यांना दैनंदिन हालचाली करणेही कठीण जात आहे. त्यामुळे मानवतेच्या दृष्टिकोनातून त्यांना पुन्हा ताब्यात घेतले जाणार नाही, असे सांगत न्यायालयाने हे प्रकरण पूर्णपणे बंद केले.

## झारखंडमध्ये परीक्षा व नियुक्त्या रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला उच्च न्यायालयाची स्थगिती

**रांची** – झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड कर्मचारी निवड आयोगामार्फत घेण्यात आलेल्या ४४ भरती परीक्षा व नियुक्त्या रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला झारखंड उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगनादेश दिला आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्य सरकारच्या आदेशाविरोधात याचिका दाखल करणाऱ्या शेकडो नवनियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

न्यायमूर्ती दीपक रोशन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. कथित गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचे कारण देत मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या नेतृत्वाखालील सरकारने औषध निरीक्षक, उपजिल्हाधिकारी, सहाय्यक प्राध्यापक, दिवाणी न्यायाधीश, वनक्षेत्रपाल, दंत चिकित्सक आणि तंत्रनिकेतन व्याख्याते अशा ४४ विविध तांत्रिक व प्रशासकीय पदांच्या परीक्षा रद्द केल्या होत्या.

मात्र, याचिकाकर्त्यांच्या बाजूने ॲड. इंद्रजित सिन्हा आणि अमृतांश वत्स यांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरत न्यायालयाने सरकारच्या 'परीक्षा रद्द' करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे.

# सलूनच्या पाटीवर 'ॲडव्होकेट' शब्दाचा बेकायदेशीर वापर

## पुणे बार असोसिएशनची कडक नोटीस

**पुणे** : सलून व्यवसायाच्या नावफलकावर (साइनबोर्ड) 'ॲडव्होकेट' या शब्दाचा आणि वकिलांच्या अधिकृत मानचिन्ह असलेल्या 'नेक बँड'चा अनधिकृत वापर केल्याप्रकरणी पुणे बार असोसिएशनने औंध येथील एका सलून मालकाला कायदेशीर नोटीस बजावली आहे. हे कृत्य वकील पेशाच्या प्रतिष्ठेला आणि सन्मानाला बाधा पोहोचवणारे असल्याचे स्पष्ट करत, असोसिएशनने १० दिवसांच्या आत स्पष्टीकरण आणि १५ दिवसांत बोर्ड हटवून अनुपालन अहवाल सादर करण्याचे कडक निर्देश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, औंध येथील डी-मार्टजवळ, रिव्हरव्ह्यू अपार्टमेंट्समधील एका सलूनच्या पाटीवर 'ॲडव्होकेट' हा शब्द आणि वकिलांचा मानचिन्ह असणारा बँड वापरण्यात आल्याचे पुणे बार असोसिएशनच्या निदर्शनास आले होते. कोणत्याही व्यावसायिक सलून आस्थापनाने अशा प्रकारे वकील व्यवसायाशी संबंधित पदवी किंवा मानचिन्हांचा गैरवापर करणे पूर्णपणे बेकायदेशीर, दिशाभूल करणारे आणि आक्षेपार्ह आहे, असे बार असोसिएशनने नोटीसमध्ये म्हटले आहे.

पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. काळूराम बाबन भुजबळ आणि सचिव ॲड. सम्राट शिवाजी जांभूळकर यांच्या नावे ही नोटीस बजावण्यात आली आहे. व्यावसायिक नावफलक, जाहिराती, सोशल मीडिया पेजेस आणि डिजिटल लिस्टिंगवरून 'ॲडव्होकेट' शब्द आणि बँडचे चित्र तत्काळ हटवावे, असे आदेश सलून मालकाला देण्यात आले आहेत.

तसेच, हा शब्द वापरण्यामागे कायदेशीर अधिकार होता का, सलून मालक किंवा भागीदार सनदधारक वकील आहेत का, याबाबत १० दिवसांत लेखी खुलासा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिलेल्या मुदतीत नोटीसची अंमलबजावणी न झाल्यास किंवा योग्य खुलासा न दिल्यास संबंधित सलून मालकाविरोधात न्यायालयात आणि सक्षम प्राधिकरणासमोर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही पुणे बार असोसिएशनने दिला आहे.

# कोल्हापूर, पुणे, नाशिक आणि अमरावती येथे कायमस्वरूपी परिक्रमा खंडपीठांची मागणी

**मुंबई:** कोल्हापूर, पुणे, नाशिक आणि अमरावती येथे वाढती प्रलंबित प्रकरणे लक्षात घेता, तेथे राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाची कायमस्वरूपी परिक्रमा खंडपीठे स्थापन करण्यात यावीत, असा महत्त्वपूर्ण प्रस्ताव राज्य आयोगाने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला पाठवला आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायाधीश तथा राज्य आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती एस. पी. तावडे यांच्या मान्यतेने प्रबंधक (विधी) नाझनिन मुनीर जमादार यांनी हा प्रस्ताव मंत्रालयात सादर केला आहे.

या चारही शहरांमधील परिक्रमा खंडपीठांचे कामकाज पूर्णवेळ आणि सुरळीत चालण्यासाठी एकूण ६८ नवीन अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करण्याची मागणी प्रस्तावात करण्यात आली आहे. सध्या राज्य आयोगाच्या ११ सदस्यांपैकी ३ पदे रिक्त असल्याने आणि कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे स्थानिक जिल्हा मंचावरून तात्पुरती व्यवस्था करावी लागत आहे. तातडीच्या प्रकरणांची सुनावणी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घ्यावी लागत असल्याने पूर्णवेळ खंडपीठ आणि स्वतंत्र कर्मचारी वृंद आवश्यक असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

प्रलंबित प्रकरणांची आकडेवारी (परिशिष्ट 'इ'):

* पुणे: ४,५०० प्रकरणे
* नाशिक: ३,२२७ प्रकरणे
* अमरावती: २,९४१ प्रकरणे
* कोल्हापूर: १,११८ प्रकरणे

६८ पदांच्या निर्मितीसह पायाभूत सुविधांचा आराखडा

प्रस्तावानुसार, प्रत्येक खंडपीठासाठी प्रत्येकी ३ सदस्य, १ प्रबंधक, २ उच्च श्रेणी लघुलेखक, १ निम्न श्रेणी लघुलेखक, १ शिरस्तेदार, १ सहाय्यक अधीक्षक, १ वरिष्ठ लिपिक/अभिलेखापाल, २ लिपिक-टंकलेखक, ३ शिपाई, १ रखवालदार आणि १ सफाई कर्मचारी अशा १७ पदांची (चारही शहरांसाठी मिळून ६८ पदे) आवश्यकता आहे. या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वार्षिक अंदाजे ८ कोटी ३३ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च अपेक्षित आहे.

याशिवाय, चारही कार्यालयांच्या संगणक, फर्निचर, सीसीटीव्ही, वातानुकूलित यंत्रे आदी अनावर्ती खर्चासाठी १ कोटी ७७ लाख ६० हजार रुपये आणि वार्षिक आवर्ती खर्चासाठी ३२ लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

कोल्हापूर येथे फर्निचरसह जागेची सोय उपलब्ध असून अमरावती येथे थोड्या दुरुस्तीनंतर जागा मिळू शकते; मात्र पुणे व नाशिक येथे कायमस्वरूपी जागेचा शोध घ्यावा लागणार आहे. कोल्हापूर डिस्ट्रिक्ट कंझ्युमर कोर्ट बार असोसिएशनने केलेल्या मागणीची दखल घेत आयोगाने शासनाला या प्रस्तावावर प्राधान्याने विचार करून मंजुरी देण्याची विनंती केली आहे.

# पीएम श्री केंद्रीय विद्यालय क्र. २ एएफएस पुणे येथे विद्यार्थी परिषद अलंकरण सोहळा उत्साहात संपन्न



**पुणे** : पीएम श्री केंद्रीय विद्यालय क्र. २ एएफएस पुणे येथे पायाभूत व पूर्वतयारी स्तराच्या विद्यार्थी परिषदेचा अलंकरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, जबाबदारी, शिस्त, संघभावना, सर्जनशीलता आणि सेवाभाव विकसित करणे हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

नवनियुक्त विद्यार्थी परिषद सदस्यांच्या आकर्षक आणि शिस्तबद्ध परेड व संचलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. बालनेत्यांनी आत्मविश्वासाने आणि उत्साहाने संचलन करत शिस्त, समन्वय आणि संघभावनेचे उत्कृष्ट दर्शन घडविले. संपूर्ण विद्यालय परिसरात आनंद, उत्साह आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले होते.

त्यानंतर नवनियुक्त विद्यार्थी पदाधिकाऱ्यांना मानाचे बॅज प्रदान करून औपचारिकरीत्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. श्रेयस पलासकर आणि सान्वी देशमुख यांची स्कूल कॅप्टन, तर अधिराज एस. बनसोडे आणि वीरा हजारे यांची स्कूल व्हाइस कॅप्टन म्हणून निवड करण्यात आली.

क्रीडा क्षेत्रातील नेतृत्वाची जबाबदारी तनिष्क सूर्यवंशी आणि श्रेयसी पाटील यांच्याकडे स्पोर्ट्स कॅप्टन म्हणून सोपविण्यात आली. तसेच विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कल्पकता आणि विविध उपक्रमांमधील सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी सात्विक पाटील आणि प्राची मुंडे यांना (सर्जनशील अध्ययन उपक्रम) कॅप्टन म्हणून जबाबदारी देण्यात आली. यासोबतच हाऊस कॅप्टन, हाऊस व्हाइस कॅप्टन, प्रीफेक्ट्स आणि विद्यार्थी परिषदेतील इतर पदाधिकाऱ्यांनाही बॅज प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थी परिषद शपथविधी. नवनियुक्त बालनेत्यांनी आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे आणि जबाबदारीने पार पाडण्याची, विद्यालयाची मूल्ये व शिस्त जपण्याची, शिक्षक व सहकारी विद्यार्थ्यांचा आदर करण्याची, लहान विद्यार्थ्यांना मदत करण्याची आणि विद्यालयाच्या प्रगतीसाठी सदैव तत्पर राहण्याची शपथ घेतली.

विद्यालयात शिवाजी, टागोर, अशोका आणि रमन अशी चार सदने असून त्यांच्या आद्याक्षरांतून ही सुंदर संकल्पना साकारली आहे. चारही सदनांतील कॅप्टन, व्हाइस कॅप्टन, प्रीफेक्ट्स आणि इतर बालनेत्यांनी आपल्या आत्मविश्वासपूर्ण सहभागाने खऱ्या अर्थाने प्रमाणे चमक दाखवली.

विद्यालयाचे प्राचार्य श्री. भारत भूषण यांनी सर्व नवनियुक्त विद्यार्थी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. लहान वयात मिळणाऱ्या नेतृत्वाच्या संधींमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शिस्त, निर्णयक्षमता आणि जबाबदारीची भावना विकसित होते, असे सांगत त्यांनी बालनेत्यांना इतर विद्यार्थ्यांसाठी आदर्श बनण्याचे आवाहन केले.

मुख्याध्यापक श्री. संजय कुमार पाटील यांनी विद्यार्थी परिषद सदस्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, बॅज हा केवळ सन्मानाचे प्रतीक नसून विद्यालयाने विद्यार्थ्यांवर दाखविलेल्या विश्वासाचे आणि त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीचे प्रतीक आहे. विद्यार्थी नेत्यांनी शिक्षकांचे सहाय्यक हात बनून शिस्त राखण्यासाठी सहकार्य करावे, लहान विद्यार्थ्यांना मदत करावी आणि स्वतःच्या वर्तनातून इतरांसमोर आदर्श निर्माण करावा. ङ्खखरे नेतृत्व म्हणजे अधिकार नव्हे; तर सेवा, जबाबदारी आणि स्वतःच्या कृतीतून आदर्श निर्माण करणे होय, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

हा सोहळा केवळ बॅज वितरणापुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांना नेतृत्व, उत्तरदायित्व, सहकार्य, सेवाभाव आणि जबाबदार नागरिकत्व यांची जाणीव करून देणारा अर्थपूर्ण अनुभव ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती नितिका कुमारी आणि श्रीमती मानसी सिंह यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच पायाभूत व पूर्वतयारी स्तरातील सर्व शिक्षकांच्या सक्रिय सहभागामुळे आणि सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला.

शिस्तबद्ध संचलन, गौरवपूर्ण बॅज प्रदान सोहळा, शपथविधी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे संपूर्ण विद्यालय परिसर आनंद, अभिमान, उत्साह आणि नेतृत्वभावनेने भारावून गेला.

# बालविकास व अन्न सुरक्षा अधिकारी नियुक्त्या रद्दच्या निर्णयाला झारखंड उच्च न्यायालयाची स्थगिती

**रांची** - झारखंड कर्मचारी निवड आयोगाच्या संयुक्त पदवी स्तर परीक्षेद्वारे नियुक्त केलेल्या बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला झारखंड उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे नवनियुक्त अधिकाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

झारखंड लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या ११ व्या आणि १३ व्या परीक्षांबाबत राज्य सरकारने जारी केलेली रद्दची अधिसूचनाही न्यायालयाने बुधवारी स्थगित केली. याशिवाय, राज्य शासनामार्फत अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या रद्द करण्याबाबत काढण्यात आलेल्या आदेशालाही उच्च न्यायालयाने अंतरिम स्थगनादेश दिला आहे. राज्य सरकारच्या या कारवाईविरोधात बाधित अधिकाऱ्यांनी न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या, त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने हे महत्त्वपूर्ण आदेश जारी केले आहेत.

## पोलिसांच्या निर्दोष सुटकेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान

**नवी दिल्ली** - गुजरात मधील सोहराबुद्दीन शेख, त्याची पत्नी कौसरबी आणि साथीदार तुलसीराम प्रजापती बनावट चकमक प्रकरणात पोलिसांच्या झालेल्या निर्दोष सुटकेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. सोहराबुद्दीनचा धाकटा भाऊ नयाबुद्दीन शेख याने मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात ही याचिका दाखल केली आहे. सन २००५ मध्ये घडलेल्या या बहुचर्चित प्रकरणात विशेष सत्र न्यायालयाने २१ पोलीस अधिकाऱ्यांसह एकूण २२ आरोपींची निर्दोष मुक्तता केली होती.

# कोथरुड पोलिसांची धडाकेबाज कामगिरी पिस्तूल तस्करी करणाऱ्या तरुणाला अटक

## एआरएआय टेकडीवरील खुनाची अवघ्या दोन तासांत उकल

**पुणे :** कोथरुड पोलिसांनी कारवाईचा धडाका लावत एकीकडे बेकायदेशीर पिस्तूल विक्रीसाठी आलेल्या एका तरुणाला अटक केली आहे, तर दुसरीकडे एआरएआय टेकडीवर झालेल्या १७ वर्षीय मुलाच्या निर्घण खुनाचा अवघ्या दोन तासांत उलगडा करत दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

पहिली कारवाई: २ पिस्तुले आणि २ जिवंत काडतुसांसह तरूण गजाआड

केळेवाडीतील कुमार प्रॉपर्टीजजवळील पंपिंग स्टेशनच्या मोकळ्या जागेत एक जण पिस्तूल विक्रीसाठी आला असल्याची गुप्त माहिती कोथरुड पोलिसांच्या तपास पथकाला मिळाली होती. पोलिसांनी डमी गिऱ्हाईक पाठवून खात्री केल्यानंतर तातडीने सापळा रचून प्रेम देवेंद्र साळुंखे (वय २१, रा. दत्तवाडी, पुणे) याला ताब्यात घेतले.

त्याची झडती घेतली असता त्याच्या कंबरेला २ पिस्तुले आणि खिशात २ जिवंत काडतुसे मिळून आली. पोलिसांनी १ लाख ५० हजार रुपयांचा ऐवज जप्त करत त्याच्याविरोधात भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर घुले या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

दुसरी कारवाई: टेकडीवरील खुनाचा अवघ्या २ तासांत छडा

एआरएआय टेकडीवर १९ ऑगस्ट रोजी सकाळी मॉर्निंग वॉकसाठी गेलेल्या नागरिकांना एका तरुणाचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह दिसून आला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला असता मयत मुलगा निल विजय नाईक (वय १७, रा. श्रावणधारा वसाहत, कोथरुड) असल्याचे निष्पन्न झाले.




वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाची ५ वेगळी पथके तयार करून शोध सुरू करण्यात आला. बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयताच्याच दोन अल्पवयीन मित्रांनी हा खून केल्याचे समोर आले. पोलिसांनी चक्रे फिरवत एकाला राहत्या घरातून तर दुसऱ्याला मार्केटयार्ड परिसरातून अवघ्या दोन तासांत ताब्यात घेतले. त्यांच्याकडून खुनात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले असून पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुनील कारोठे पुढील तपास करत आहेत. ही धडाकेबाज कामगिरी पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त संजय दराडे, अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे, प्रभारी पोलीस उपआयुक्त मिलिंद मोहिते, पोलीस उपआयुक्त सागर कवडे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त सुजाता तानवडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण घोडके, पोलीस निरीक्षक अनिल माने, सुनील कारोठे आणि तपास पथकाने केली.

सर्व प्रकारच्या जाहीर सूचना/ वकील नोटीस आणि अन्य जाहिराती स्वीकारण्याकरिता
संपर्क : श्रेयश दहिवळ,
मो. ९९२२४१२४५१
ऑफिस संपर्क :
०२०-२९९९ २५३०
QR Code स्कॅन करा, पे करा.
वर्गणीचे पर्याय |
स्वागत मूल्य : फक्त रु. १०
एक वर्षासाठी रु. ५००
रक्कम भरल्याची पेमेंट रिसीट, आपले नाव, पिनकोडसह पूर्ण पत्ता आणि मोबाईल नंबर : ९९२२४१२४५१ या क्रमांकावर मॅसेज करा!

# न्यायालयीन हस्तक्षेप आणि प्रशासकीय उत्तरदायित्व

## देशातील दोन महत्त्वाच्या घडामोडींचे संकेत

लोकशाही व्यवस्थेत जेव्हा नागरिकांचे घटनात्मक अधिकार, आंदोलकांचे स्वातंत्र्य आणि तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर येतो, तेव्हा न्यायव्यवस्था हीच अंतिम आधारवड ठरते. नुकत्याच सर्वोच्च न्यायालय आणि झारखंड उच्च न्यायालयाने दिलेल्या दोन वेगवेगळ्या निर्णयांमधून प्रशासकीय मनमानीवर वेसण घालण्याचे आणि कायदा-सुव्यवस्थेच्या नावाने होणाऱ्या अतिरेकाला चाप लावण्याचे काम न्यायपालिकेने केले आहे.

पहिल्या प्रकरणात, राजधानी दिल्लीतील जंतरमंतर येथे विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेला पोलीस बळाचा कथित अतिवापर हा गंभीर चिंतेचा विषय ठरला होता. आंदोलकांवर झालेला लाठीमार, पेलेट गन आणि इलेक्ट्रिक काठ्यांचा वापर, तसेच साध्या वेषातील पोलिसांची तैनाती यांमुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने पाच सदस्यांची उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आर. सुभाष यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या या समितीमध्ये उच्च न्यायालयांचे माजी मुख्य न्यायमूर्ती, सीबीआयचे माजी संचालक आणि माजी पोलीस महासंचालक अशा अनुभवी दिग्गजांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, ही समिती केवळ पोलिसांच्या कारवाईचीच नव्हे, तर आंदोलकांकडून पोलिसांवर झालेले हल्ले आणि सार्वजनिक मालमत्तेचे झालेले नुकसान यांचीही निस्पृहपणे चौकशी करणार आहे. यामुळे आंदोलनाचा अधिकार आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचा समतोल राखण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

दुसऱ्या घडामोडीत, झारखंड उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या एका घाईघाईने घेतलेल्या निर्णयाला चाप लावला आहे. झारखंड लोकसेवा आयोग आणि कर्मचारी निवड आयोगामार्फत पार पडलेल्या ४४ विविध भरती परीक्षा व नियुक्त्या अचानक रद्द करण्याचा निर्णय मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या सरकारने घेतला होता. कथित गैरव्यवहार आणि आंदोलनांचे कारण देत उपजिल्हाधिकारी, दिवाणी न्यायाधीश, सहाय्यक प्राध्यापक व औषध निरीक्षक यांसारख्या महत्त्वाच्या ४४ प्रशासकीय व तांत्रिक पदांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या होत्या. यामुळे प्रामाणिकपणे परीक्षा उत्तीर्ण झालेल्या शेकडो नवनियुक्त उमेदवारांचे भवितव्य अंधारात सापडले होते.

मात्र, न्यायमूर्ती दीपक रोशन यांच्या खंडपीठाने या निर्णयाला अंतरिम स्थगनादेश देऊन हजारो तरुणांना मोठा दिलासा दिला आहे. कोणत्याही ठोस तपासाशिवाय सरसकट संपूर्ण परीक्षा व नियुक्त्या रद्द करणे हा उमेदवारांवर अन्याय असल्याचे उच्च न्यायालयाच्या भूमिकेतून स्पष्ट होते.

एकंदरीत, जंतरमंतर येथील पोलीस कारवाईची उच्चस्तरीय चौकशी आणि झारखंडमधील भरती परीक्षांवरील स्थगिती उठवणे, या दोन्ही घटना हेच दर्शवतात की, शासन किंवा पोलीस यंत्रणा आपल्या अधिकारांचा गैरवापर करू शकत नाही. पारदर्शकता, नियम आणि नागरिकांचे मूलभूत हक्क हेच लोकशाहीचे खरे अधिष्ठान आहेत.

NATARAJ REALTY
Nataraj Realty
CIVIL ENGG. & CONTRACTORS
PROMOTERS & BUILDERS
Vikram Agarwal B.E. Civil
+91 9766532648
1041, Nataraj Court, Shukrawar Peth, Pune - 411 002
vikrammittal5006@gmail.com www.natarajrealty.com

Registration for Periodicals Title "Developed Nations" vide PRGI Registration No. MHMUL/25/A0594. Printed by Shree Samarth Printers, Published by Sanjay Raghunath Sapkale on behalf of printed at Pune and published at C - 205, Fortune Empress Society, Haandewadi Road, Autade Haandewadi, Haveli, Hadapsar. Resident Editor - Sanjay Raghunath Sapkale, Managing Editor: M J Srikant.